cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३१८ | सोमवार दि.१६ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### अविश्वास फेटाळला; मात्र प्रश्नांचे काय?

भारतीय लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ मानल्या जाणाऱ्या लोक सभामध्ये अलीकडे घडलेली एक घटना संसदीय परंपरांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारी ठरली. सभागृहाचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरुद्ध विरोधी पक्षांनी अविश्वासाचा प्रस्ताव दाखल केला. संसदीय गणित लक्षात घेतल्यास हा प्रस्ताव यशस्वी होण्याची शक्यता जवळपास नव्हतीच. अखेरीस तो आवाजी मतदानाने फेटाळलाही गेला.

# हरभऱ्याची हमीभावाने खरेदी मात्र जाचक अटीने शेतकरी त्रस्त

पुणे । प्रतिनिधी

**शासनाने हरभरा खरेदीसाठी प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केला असला तरी त्यासाठी काही अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. ई–पीक पाहणी, ऑनलाइन नोंदणी आणि दर्जा निकष पूर्ण केल्यानंतरच शेतकऱ्यांकडून हरभरा खरेदी केली जाणार आहे.**

हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हमीभावाने हरभरा खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील ९ खरेदी केंद्रांवर प्रति क्विंटल ५,८७५ रुपये या हमीभावाने हरभरा खरेदी केली जात आहे. यंदाच्या हंगामात हरभऱ्याचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढल्याने उत्पादनही चांगले होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना



हमीभाव मिळावा आणि बाजारातील दरांतील चढ–उताराचा फटका बसू नये, या उद्देशाने शासनाने खरेदी प्रक्रिया सुरू केली आहे. हमीभावाने हरभरा विक्रीसाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासाठी शेतकऱ्यांना ३१ मार्चपर्यंत नोंदणी करण्याची मुदत देण्यात आली आहे. नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया १ मार्चपासून सुरू झाली असून, ती २९ एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे. ग्रामीण भागात स्मार्टफोन आणि इंटरनेटची सुविधा सर्वत्र उपलब्ध नसल्यामुळे अनेक शेतकरी ऑनलाइन नोंदणीपासून वंचित राहत असल्याचे सांगितले जात आहे.

▶▶ पान २ वर

### हरभरा खरेदीसाठी प्रमुख अटी

ऑनलाइन नोंदणी आवश्यक. ई–पीक पाहणी नोंद असणे आवश्यक. ७/१२ व ८–अ उतारा आवश्यक. आधार व बँक खाते लिंक असणे. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडूनच खरेदी. दर्जा निकष पूर्ण असावे. आर्द्रता मर्यादित असावी. खराब किंवा तुटलेले दाणे कमी असावेत. कीडग्रस्त माल स्वीकारला जात नाही.

# पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले!

## प.बंगालमध्ये दोन टप्प्यात मतदान

नवी दिल्ली । वृतसंस्था

पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळम, आसाम या चार राज्यांसह पुद्दुचेरी केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकांची घोषणा रविवारी (दि.१५) निवडणूक आयोगाने केली. आसाम, केरळम, पुदुच्चेरी येथे ९ एप्रिल २०२६ रोजी मतदान होईल. तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान होणार आहे. तर पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक दोन टप्प्यांमध्ये होणार असून, येथे २३ एप्रिल आणि २९



एप्रिल २०२६ रोजी मतदान होईल. पाचही राज्यांमधील मतमोजणी ४ मे २०२६ रोजी होईल, अशी माहिती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पश्चिम बंगालमध्ये निवडणूक दोन टप्प्यांत पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात (१५२ जागा) ३० मार्चला अधिसूचना येईल, ६ एप्रिलपर्यंत अर्ज भरता येतील

▶▶ पान २ वर

### पाच राज्यांमध्ये १७.४ कोटी मतदार, ८२४ विधानसभा मतदारसंघ

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितले की, आसाम, केरळम, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि पुद्दुचेरी या राज्यांमध्ये एकूण १७.४ कोटी मतदार आणि ८२४ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या प्रक्रियेसाठी सुमारे २.१९ लाख मतदान केंद्रे तयार करण्यात आली असून साधारण २५ लाख कर्मचारी निवडणूक कामात तैनात केले जातील. साम विधानसभेची मुदत २० मे, केरळची २३ मे, पुद्दुचेरीची १५ जून, तामिळनाडूची १० मे आणि पश्चिम बंगाल विधानसभेची मुदत ७ मे रोजी संपत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मतदारांच्या संख्येचा आढावा देताना सांगितले की, अंतिम यादीनुसार आसाममध्ये सुमारे २.२५ कोटी, केरळममध्ये २.७ कोटी, पुद्दुचेरीमध्ये ९.४४ लाख आणि तामिळनाडूमध्ये ५.६७ कोटी मतदार आहेत; तसेच २८ फेब्रुवारीच्या अंतिम यादीनुसार पश्चिम बंगालमध्ये ६.४४ कोटी मतदार असून, माननीय न्यायाधीशांच्या निर्णयानुसार जी काही अतिरिक्त (पुरवणी) यादी येईल, ती यामध्ये नंतर समाविष्ट केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# बारामती व राहुरीची पोटनिवडणूक २३ एप्रीलला

नवी दिल्ली । वृतसंस्था

**भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पश्चीम बंगाल, आसाम या तामिळनाडू व केरळ या राज्यांतील निवडणूकीची घोषणा करताना याबरोबरच महाराष्ट्र, गुजरात, गोवा, कर्नाटका, नागालँड, त्रिपूरा, या राज्यांतील पोटनिवडणूकांची देखील घोषणा करण्यात आली.**

यापैकी गोवा, कर्नाटक, नागलँड, व त्रिपूरा या राज्यातील पोटनिवडणूकीसाठी ९ एप्रिलला मदतान होईल तर महाराष्ट्र व गुजरातमधील पोटनिवडणूकीसाठी २३ एप्रिलला मतदान हाईल.

महाराष्ट्रातील बारामती व राहुरी या दोन मतदार संघाची पोट निवडणूक जाहीर केली



आहे. महाराष्ट्राचे तत्कालिन उपमुख्यमंत्री अजित पवार याचे २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यामुळे त्यांचा मतदारसंघ असलेल्या बारामती विधानसभेची जागा रिक्त आहे. तसचे नगर मधील राहूरी मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कार्डिले यांचे निधन झाल्याने तिही जागा रिक्त आहे. या दोन जागांवरील

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### संयुक्त अरब अमिरातीकडून विमान उड्डाणांवर निर्बंध

दुबईः पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे संयुक्त अरब अमिरातीमध्ये विमान वाहतुकीवर निर्बंध लादण्यात आले आहेत. याचा मोठा फटका भारतीय प्रवाशांना बसला असून एअर इंडियाने रविवारी आपल्या अनेक विमानफेऱ्या रद्द केल्या आहेत तर इंडिगोने विमान प्रवासाच्या वेळापत्रकात बदल केले आहेत. यूएई विमानतळ प्राधिकरणाने विमान कंपन्यांना त्यांचे उड्डाणे कमी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या संदर्भात एक्सवर माहिती देताना एअर इंडियाने म्हटले की यूएईकडून प्राप्त झालेल्या ताज्या सूचनांनुसार, एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेसला १५ मार्च २०२६ रोजीच्या आपल्या तात्पुरत्या विमानफेऱ्या कमी कराव्या लागत आहेत. शारजाहून दिल्ली, कन्नूर, कोची, कोझिकोड, मुंबई आणि तिरुवनंतपुरमसाठी विमान फेऱ्या सुरू ठेवण्याचे कंपनीचे नियोजन आहे. तसेच, स्लॉट उपलब्धतेनुसार रास अल खैमाह ते कोझिकोड आणि कोची सेवा चालवल्या जातील. ज्या प्रवाशांची विमाने रद्द झाली आहेत, त्यांना कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय पुढील तारखेचे तिकीट बुक करण्याचा किंवा पूर्ण परतावा घेण्याचा पर्याय देण्यात आला आहे.

### साईभक्तांना मिळणार एकच लाडू पाकीट

शिर्डी : अमेरिका–इराण–इस्रायल यांच्यातील संघर्षामुळे एलपीजी गॅसच्या पुरवठ्याबाबत चिंता वाढत आहे. शिर्डी साईबाबा संस्थानकडे सध्या साधारणतः दहा ते बारा दिवस पुरेल इतकाच एलपीजी गॅसचा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे शिर्डी साईबाबा संस्थान प्रसादाच्या पदार्थांमध्ये आणि लाडू वाटपामध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. शिर्डी साईबाबा संस्थानने दूरदृष्टी दाखवत प्रसादालयातील प्रसाद व्यवस्थेत आणि लाडू प्रसादात तात्पुरता बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर आता फक्त एक भाजी आणि चपाती बनवण्याचे काम संस्थानकडून केले जात आहे. तसेच साईबाबा संस्थानकडे असलेल्या सोलर सिस्टमवर भात आणि कडधान्य शिजवले जात आहे. लाडू प्रसाद बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणात एलपीजी गॅस लागत असल्याने जिथे दररोज ५० हजार लाडू पाकिटे बनवली जात होती तिथे आता २५ ते ३० हजार लाडू पाकिटं बनवली जात आहेत.

### शक्तिपीठ महामार्ग तत्काळ रद्द करा

सिंधुदुर्गः पवनार ते पत्रादेवी या ८०२ किलोमीटर लांबीच्या शक्तिपीठ महामार्गामुळे कोकणच्या निसर्गाचा आणि शेतीचा मोठा विद्ध्वंस होणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प तातडीने रद्द व्हावा, अशी मागणी सिंधुदुर्ग शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे. संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांची भेट घेण्यात आली. या वेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी, गिरीश फोंडे, सतीश लळीत, माजी आमदार वैभव नाईक, एम. के. गावडे आदी उपस्थित होते. शक्तिपीठ महामार्गामुळे दुर्मीळ जैवविविधता धोक्यात येणार आहे. पश्चिम घाट संवर्धनासाठी नेमलेल्या आयोगाने हा भाग पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील घोषित केला असतानाही सरकार याकडे दुर्लक्ष करीत आहे. वन्यप्राणी आणि वनसंपदेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे हा महामार्ग रद्द करण्यात यावा. एकीकडे रत्नागिरी–नागपूर हा महामार्ग अगोदरच अस्तित्वात असताना पुन्हा समांतर महामार्गाची गरज काय, असा प्रश्न देखील संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१४ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २१६.५० क्विंटल | २,००० | २,६०० | २,२६८ |
| ज्वारी/हायब्रिड: १९४.०० क्विंटल | २,००० | ५,००१ | ३,४७४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,५०१ | ७,५०१ | ७,५०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ३.५० क्विंटल | २,१०१ | २,७६० | २,५२२ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | ५,१५० | ५,१५० | ५,१५० |
| हरभरा: २६.०० क्विंटल | ५,००० | ५,११५ | ५,०३५ |

# सौरउर्जा प्रकल्पामध्ये महाराष्ट्र देशात पहिला

● तब्बल १ लाख ८ हजार घरांवर पॅनल बसविण्यात यश



पुणे । प्रतिनिधी

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची अंमलबजावणी करताना १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त अर्जापैकी १ लाख ८ हजार घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्र राज्याने देशात प्रथम क्रमांक मिळविला

▶▶ पान २ वर

# धाराशिव– लातूर– तुळजापूर महामार्गावर विचित्र अपघात; ३ ठार

धाराशिव । प्रतिनिधी

**धाराशिव–लातूर–तुळजापूर या राष्ट्रीय महामार्गावर रविवारी (१५ मार्च ) रोजी दुपारी काळजाचा थरकाप उडवणारा भीषण अपघात झाला. बोलेरो, वॅगनार आणि होंडा सिटी या तीन गाड्या एकमेकांवर आदळल्याने झालेल्या या विचित्र अपघातात तीन जणांचा जागीच ठार झाले असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत.**

करजखेडा पाटीजवळ झालेल्या या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली असून परिसरात शोककळा पसरली आहे. प्राथमिक माहितीनुसार, बोलेरो गाडी अतिवेगाने धावत होती. करजखेडा पाटीजवळ चालकाचे



गाडीवरील नियंत्रण सुटले आणि ही बोलेरो समोरील वॅगनार कारला जोरदार धडकली. धडक इतकी भीषण होती की बोलेरो गाडी पलटी झाली आणि दुभाजक ओलांडून पलीकडील लेनमध्ये गेली. याच दरम्यान समोरून येणाऱ्या होंडा सिटी कारवर ही गाडी

▶▶ पान २ वर

# पोलीस पाटील, ग्रामसेवकावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश

बीड । प्रतिनिधी

**महिलेवर अत्यचार प्रकरण**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून कायम चर्चेत असलेल्या आणि गुन्हेगारी प्रकरणांनी गाजत असलेल्या बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अल्पवयीन महिलेस घरातून नेऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आला आहे. याप्रकरणी, महिला आयोगाने दखल घेतली आहे. बीड जिल्ह्यातील हिवरा पहाडी येथील महिला रात्री घरी झोपलेली असताना घरातून उचलून नेत तिच्यावर लैंगिक अत्याचार करून रात्रभर गावच्या चावडीवर बांधून ठेवल्याची बातमी

▶▶ पान २ वर

# गॅसधारकांचा सिलिंडर पुरवठा बंद

दिल्ली । वृतसंस्था

पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम नागरिकांच्या घरातील किचनवर झाल्याचे दिसून येत आहे. सरकारकडून गॅसटंचाई नाही असे सांगण्यात येत असले तरीही गॅसटंचाई जाणवत आहे.

▶▶ पान २ वर

# मुख्यमंत्री फडणवीस यांना कृषी विद्यापीठाची डॉक्टरेट

## अन्नसुरक्षा, आर्थिक स्थैर्यासाठी कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची–राज्यपाल



राहुरी । प्रतिनिधी

जगातील एका भागातील युद्ध व संघर्षाचा परिणाम सर्वत्र होत असल्याने देशाची कृषी व्यवस्था अधिक सक्षम करणे व अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. देशाच्या अन्नसुरक्षा, आर्थिक स्थैर्य व शाश्वत विकासासाठी कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, भारतीय कृषीचे भविष्य तंत्रज्ञानाधारित उपाय, स्टार्टअप्स व शाश्वत पद्धतींवर अवलंबून आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलपती जिष्णू देव वर्मा यांनी केले.

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित ३९ व्या पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्यपालांच्या हस्ते 'डॉक्टर ऑफ सायन्स' या मानद पदवीने सन्मानित करण्यात आले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे,

▶▶ पान २ वर

सुस्नेह निमंत्रण

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

५ वा वर्धापन दिन समारंभ

गुढीपाडव्याच्या पवित्र आणि शुभमुहूर्तावर दैनिक राज्य लोकतंत्र आपला पाचवा वर्धापन दिन साजरा करत आहे. हा क्षण आमच्यासाठी केवळ उत्सवाचा नाही, तर कृतज्ञतेचा, अभिमानाचा आणि नव्या संकल्पांचा आहे.

गेल्या पाच वर्षाचा प्रवास सोपा नव्हता. अनेक आव्हानं, अनेक वळणं आली... मात्र प्रत्येक टप्प्यावर सामान्य वाचकांचा विश्वास, हितचिंतकांचे मोलाचे आशीर्वाद आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेवर ठेवलेली श्रद्धा यामुळेच दैनिक राज्य लोकतंत्र आज या उंचीवर उभं आहे. केवळ बीड जिल्हा नाही तर मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील पुणे अहिल्यानागर या भागात देखील विस्तार झाला.

शेती आणि शेतकरी हा आमच्या लेखणीचा श्वास आहे. मातीशी नाळ जोडलेली, घामाच्या थेंबांना शब्द देणारी आणि शेतकऱ्यांच्या वेदना समाजासमोर मांडणारी हीच आमची ओळख आहे. सहाव्या वर्षात पाऊल टाकताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. त्यातच २०२६ हे जागतिक महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे होत असल्याने, शेती सांभाळणाऱ्या, कुटुंब उभं करणाऱ्या आणि देशाच्या अन्नसुरक्षेची धुरा वाहणाऱ्या शेतकरी मायलेकींना वंदन करण्याचा हा योग आमच्यासाठी दुग्धशर्करेसारखा गोड आहे. या आनंदाच्या क्षणी, दिनांक १९ मार्च गुढीपाडव्याच्या दिवशी आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमास आपली उपस्थिती आमच्यासाठी सन्मानाची आणि प्रेरणादायी ठरेल. आपण आवर्जून यावे, आमच्या आनंदात सहभागी व्हावे, हीच नम्र आणि मनापासून विनंती.

● आपले स्नेहांकित ●

सौ.सीमा मस्के (मोकाशे) – संपादक
गणेश मोकाशे – संचालक संपादक
संजीव ओक – पुणे आवृत्ती प्रमुख
सुभाष चौरे – कार्यकारी संपादक
अनिल जाधव – मुख्य उपसंपादक
विशाल साळुंके – उपसंपादक
दिलीप शिंगाडे – व्यवस्थापक

मुख्य कार्यालय ऑफीस क्र.५, सुखवानी फोर्च्यून, घरोंदा रेसिडेन्सी, मोरवाडी, पिंपरी (चिं.), पुणे

बीड कार्यालय : जाधव बिल्डींग, राजीव गांधी चौक, बीड ४३११२२

दि.१९ मार्च २०२६, वेळ : सायंकाळी ५ ते १०
स्थळ : हॉटेल ग्रँड यशोदा बार्शी रोड बीड

cmyk

## अग्रलेख

# अविश्वास फेटाळला ; मात्र प्रश्नांचे काय ?

भारतीय लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ मानल्या जाणाऱ्या लोक सभामध्ये अलीकडे घडलेली एक घटना संसदीय परंपरांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारी ठरली. सभागृहाचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरुद्ध विरोधी पक्षांनी अविश्वासाचा प्रस्ताव दाखल केला. संसदीय गणित लक्षात घेतल्यास हा प्रस्ताव यशस्वी होण्याची शक्यता जवळपास नव्हतीच. अखेरीस तो आवाजी मतदानाने फेटाळलाही गेला. परंतु या घटनेचा अर्थ केवळ एक प्रस्ताव पराभूत झाला एवढाच नाही; उलट सत्ताधारी आणि विरोधकांमधील वाढत्या अविश्वासाची ती एक गंभीर राजकीय नोंद ठरते.

संसद ही केवळ कायदे मंजूर करण्याची यंत्रणा नसते; ती देशातील लोकशाही संवादाचे सर्वात महत्त्वाचे व्यासपीठ असते. सरकारच्या निर्णयांवर प्रश्न विचारणे, धोरणांवर टीका करणे आणि जनतेच्या भावना सभागृहात मांडणे हा विरोधकांचा मूलभूत अधिकार आहे. लोकशाही व्यवस्थेत विरोधक हे केवळ सरकारचे प्रतिस्पर्धी नसतात, तर ते लोकशाहीचे संरक्षकही असतात. त्यामुळे जेव्हा विरोधकांकडून असा आरोप केला जातो की त्यांना सभागृहात बोलू दिले जात नाही, माईक बंद केले जातात किंवा महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा टाळली जाते, तेव्हा ती बाब केवळ राजकीय वाद म्हणून दुर्लक्षित करता येत नाही.

अविश्वास प्रस्ताव हा विरोधकांकडे असलेला अत्यंत गंभीर संसदीय उपाय मानला जातो. बहुमत नसतानाही विरोधकांनी हा प्रस्ताव मांडला, याचा अर्थ त्यांचा उद्देश सरकार पाडण्याचा नव्हता, तर संसदीय प्रक्रियेवर लक्ष वेधण्याचा होता. लोकशाहीत कधी कधी पराभव निश्चित असतानाही संघर्ष केला जातो, कारण त्या संघर्षातून लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न असतो. या प्रस्तावातून विरोधकांनी जनतेसमोर असा संदेश देण्याचा प्रयत्न केला की संसद ही केवळ बहुमताच्या ताकदीवर चालणारी संस्था नाही; ती संवाद, चर्चा आणि सहमती यांवर उभी असलेली व्यवस्था आहे.

दुसरीकडे, सभापतींची भूमिका देखील अत्यंत गुंतागुंतीची असते. सभागृहात शिस्त राखणे, नियमावलीनुसार कामकाज चालवणे आणि गोंधळाच्या परिस्थितीत निर्णय घेणे ही त्यांची जबाबदारी असते. सत्ताधारी पक्षाचा दावा असा आहे की अनेकदा विरोधक जाणीवपूर्वक गोंधळ निर्माण करून कामकाज ठप्प करण्याचा प्रयत्न करतात. अशा परिस्थितीत सभागृहाची प्रतिष्ठा टिकवण्यासाठी अध्यक्षांना कठोर पावले उचलावी लागतात. ओम बिर्ला यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे की त्यांनी अनेकदा कामकाजाचे तास वाढवले, चर्चेला अधिक वेळ दिला आणि विविध मुद्द्यांवर सर्व पक्षांना बोलण्याची संधी दिली. त्यामुळे विरोधकांचे आरोप पूर्णपणे योग्य नाहीत, असा त्यांचा युक्तिवाद आहे. परंतु प्रश्न केवळ नियमांचे पालन झाले की नाही यापुरता मर्यादित नाही. लोकसभेचे अध्यक्ष हे कोणत्याही एका पक्षाचे प्रतिनिधी नसून ते संपूर्ण सभागृहाचे संरक्षक मानले जातात. त्यांची तटस्थता हीच त्यांच्या पदाची खरी ताकद असते. त्यामुळे जेव्हा सभापतींच्या निष्पक्षतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होते, तेव्हा तो केवळ एका व्यक्तीचा प्रश्न राहत नाही; तो संपूर्ण संसदीय संस्थेच्या विश्वासार्हतेशी संबंधित बनतो. भारतीय संसदीय परंपरेत सभापतींच्या आसनाला अत्यंत उंच स्थान दिले गेले आहे. एकदा त्या आसनावर बसल्यानंतर पक्षीय ओळखी बाजूला ठेवून पूर्णपणे तटस्थ राहणे ही अपेक्षा असते. अनेकदा असे घडले आहे की सत्ताधारी पक्षातून आलेले सभापतीही निर्णय घेताना सरकारच्या विरोधात गेले आहेत. यामुळेच संसदेच्या संस्थांवर लोकांचा विश्वास टिकून राहिला आहे. म्हणूनच अध्यक्षांच्या निर्णयांबाबत जर सातत्याने वाद निर्माण होत असतील, तर त्या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक ठरते. अविश्वास प्रस्ताव फेटाळला गेला असला तरी त्यातून उभे राहिलेले प्रश्न कायम राहतील. संसद ही केवळ बहुमताची ताकद दाखवण्याचे ठिकाण नसून ती विचारांची देवाणघेवाण करण्याची संस्था आहे. लोकशाहीचे खरे सामर्थ्य हे डोके मोजण्यात नसून मतांना ऐकण्यात असते. बहुमताचा आधार असला तरी विरोधकांचा आवाज दाबला गेला, अशी भावना निर्माण झाली तर लोकशाहीची गुणवत्ता कमी होते.

आजची परिस्थिती पाहता सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संवाद जवळजवळ तुटल्याचे चित्र दिसते. अशा वेळी मध्यस्थी करण्याची सर्वात मोठी जबाबदारी सभापतींवर येते. सभागृहातील सर्व पक्षांना विश्वासात घेणे, चर्चा घडवून आणणे आणि तणाव कमी करणे हे त्यांच्या नेतृत्वकौशल्याचे खरे मोजमाप ठरते. लोकशाहीत संघर्ष अपरिहार्य असतो; परंतु संवाद संपला की संघर्षाचे रूप धोकादायक बनते. सभागृहात चर्चा थांबली की त्याची जागा आरोप–प्रत्यारोप, गोंधळ आणि अविश्वास घेतात. म्हणूनच आज गरज आहे ती संसदीय संवादाची परंपरा पुन्हा मजबूत करण्याची. सत्ताधाऱ्यांनी बहुमताचा अहंकार टाळणे आवश्यक आहे, तर विरोधकांनीही केवळ विरोधासाठी विरोध न करता रचनात्मक भूमिका घ्यावी लागेल. अखेर, लोक सभा ही केवळ राजकीय पक्षांची रणभूमी नसून ती भारतीय जनतेच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे. तिचे पावित्र्य टिकवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. अध्यक्षांवरील अविश्वासाचा प्रस्ताव फेटाळला गेला असला, तरी त्यातून उमटलेला संदेश स्पष्ट आहेलोकशाही केवळ संख्याबळावर चालत नाही; ती विश्वास, संवाद आणि परस्पर आदर या तीन स्तंभांवर उभी असते. भारतीय संसदीय व्यवस्थेची खरी कसोटी आता इथेच आहे. बहुमताचा आवाज मोठा असला तरी अल्पमताचा आवाज ऐकू येईल का? जर त्या आवाजाला स्थान मिळाले, तरच लोकशाहीचे हे मंदिर खऱ्या अर्थाने पवित्र राहील.

# अमेरिका इराण संघर्ष, होरमुझ सामुद्रधुनी जागतिक ऊर्जा राजकारण व भारत देश

**प्रस्तावना : पश्चिम आशियातील तणाव आणि जागतिक अस्थिरता – पश्चिम आशिया हा जगातील सर्वात संवेदनशील आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश मानला जातो. तेल व नैसर्गिक वायूचे प्रचंड साठे, धार्मिक आणि राजकीय संघर्ष, महासत्तांची उपस्थिती आणि महत्त्वाचे समुद्री व्यापार मार्ग यामुळे या प्रदेशातील कोणतीही घटना संपूर्ण जगावर परिणाम करते. सध्या अमेरिका आणि इराण यांच्यात निर्माण झालेला तणाव पुन्हा एकदा जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. या संघर्षामुळे ऊर्जा बाजार, आंतरराष्ट्रीय व्यापार, समुद्री वाहतूक आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

अमेरिका–इराण तणावाचा केंद्रबिंदू म्हणजे पर्शियन गल्फ परिसर आणि विशेषतः होरमुझ सामुद्रधुनी. ही अरुंद समुद्री वाहतूक पट्टी जगाच्या ऊर्जा पुरवठ्याची जीवनरेखा मानली जाते. जगातील सुमारे पाचव्या भागाचे कच्चे तेल या मार्गाने वाहतूक होते. त्यामुळे या प्रदेशातील कोणतीही अस्थिरता तेलाच्या किंमती, ऊर्जा पुरवठा आणि जागतिक अर्थव्यवस्थेला थेट प्रभावित करते. अमेरिका इराण संघर्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी – अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव हा आजचा नाही. त्याची मुळे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आहेत. १९५०–६० च्या दशकात इराणमध्ये शाह मोहम्मद रझा पहलवी यांचे शासन होते आणि त्या काळात इराण अमेरिकेचा जवळचा मित्रदेश मानला जात होता. परंतु १९७९ मध्ये झालेल्या इस्लामिक क्रांतीनंतर इराणमध्ये आयातुल्ला खोमेनी यांच्या नेतृत्वाखाली नवीन इस्लामिक शासन स्थापन झाले आणि अमेरिकेविरोधी धोरणे स्वीकारली गेली. क्रांतीनंतर अमेरिकन दूतावासातील कर्मचाऱ्यांना ओलीस ठेवण्याच्या घटनेमुळे दोन्ही



देशांमधील संबंध पूर्णपणे तणावपूर्ण झाले. त्यानंतर अमेरिका आणि इराण यांच्यात आर्थिक निर्बंध, राजनैतिक संघर्ष आणि अप्रत्यक्ष लष्करी संघर्ष सुरूच राहिले. २१ व्या शतकात या तणावाला नवे स्वरूप मिळाले . इराणच्या अणु कार्यक्रमामुळे अमेरिका आणि पाश्चात्य देशांमध्ये चिंता वाढली. २०१५ मध्ये इराण आणि पाच जागतिक शक्तींमध्ये अणु करार झाला. परंतु २०१८ मध्ये अमेरिकेने या करारातून माघार घेतली आणि इराणवर पुन्हा कठोर आर्थिक निर्बंध लादले. त्यानंतर तणाव अधिक वाढला. मध्यपूर्वेतील सामरिक समीकरणे – मध्यपूर्वेतील राजकारण अत्यंत गुंतागुंतीचे आहे . येथे तीन प्रमुख शक्ती केंद्रे मानली जातात इराण, सौदी अरेबिया आणि इस्रायल. या तिन्ही शक्तींमध्ये स्पर्धा आणि परस्पर अविश्वास आहे. इराणचा प्रभाव इराक, सीरिया, लेबनॉन आणि येमेनमध्ये वाढत असल्याचे मानले जाते. लेबनॉनमधील हिझबुल्ला संघटना आणि येमेनमधील हूथी बंडखोर यांना इराणचा पाठिंबा असल्याचा आरोप केला जातो. यामुळे सौदी अरेबिया आणि इतर अरब देशांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष हा मध्यपूर्वेतील आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. इस्रायलला अमेरिकेचा ठाम पाठिंबा आहे, तर इराण इस्रायलच्या अस्तित्वालाच विरोध करतो. या परस्परविरोधी भूमिकेमुळे संपूर्ण प्रदेशात तणाव कायम राहतो. वादाचे प्रमुख कारण – अमेरिका–इराण संघर्षाची काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत : पहिले कारण म्हणजे अणु कार्यक्रम. अमेरिका आणि पाश्चात्य देशांचा आरोप आहे की इराण अण्वस्त्र विकसित करण्याचा प्रयत्न करीत आहे. इराण मात्र हा कार्यक्रम शांततापूर्ण उद्देशांसाठी असल्याचे सांगतो. दुसरे कारण म्हणजे तेल आणि ऊर्जा राजकारण. पर्शियन गल्फ प्रदेशात जगातील सर्वात मोठे तेलसाठे आहेत. त्यामुळे या प्रदेशावर प्रभाव मिळवण्यासाठी जागतिक शक्तींमध्ये स्पर्धा असते. तिसरे कारण म्हणजे इस्रायल–इराण वैर. इस्रायलला इराणकडून सुरक्षा धोका असल्याचे वाटते. त्यामुळे अमेरिका इस्रायलच्या बाजूने उभी राहते. चौथे कारण म्हणजे सामरिक समुद्री मार्ग. होरमुझ सामुद्रधुनी हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग असल्यामुळे त्यावर नियंत्रण मिळवण्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो. होरमुझ सामुद्रधुनी : जगाची ऊर्जा जीवनरेखा – होरमुझ सामुद्रधुनी ही इराण आणि ओमान यांच्या दरम्यान असलेली अरुंद समुद्री वाहतूक पट्टी आहे. ती पर्शियन गल्फ आणि अरबी समुद्र यांना जोडते. या मार्गाची रुंदी सुमारे तीस ते चाळीस किलोमीटर इतकी आहे. जहाज वाहतुकीसाठी ठराविक मार्ग केवळ काही किलोमीटर रुंद आहे. या सामुद्रधुनीचे महत्त्व मोठे आहे. जगातील सुमारे वीस टक्के कच्चे तेल आणि मोठ्या प्रमाणात द्रवित नैसर्गिक वायू या मार्गाने वाहतूक होते. सौदी अरेबिया, कुवेत, इराक, कतार आणि संयुक्त अरब अमिरात यांसारख्या देशांमधून निघणारे तेल टँकर या मार्गाने जगभर पोहोचतात. जर हा मार्ग बंद झाला किंवा वाहतूक अडथळली तर जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर मोठा परिणाम होऊ शकतो. संघर्षाचे आर्थिक आणि लष्करी परिणाम – अमेरिका–इराण तणावामुळे ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण होते. तेलाच्या किंमती वाढण्याची शक्यता असते. तेल टँकरवर हल्ले किंवा समुद्री चकमकी झाल्यास विमा खर्च वाढतो. जहाज कंपन्या जोखीम टाळण्यासाठी मार्ग बदलतात. लष्करीदृष्ट्या देखील हा संघर्ष गंभीर ठरू शकतो. ड्रोन, क्षेपणास्त्र आणि नौदल तळांवरील हल्ले या प्रदेशातील तणाव वाढवू शकतात. यामुळे संपूर्ण मध्यपूर्वेत युद्धाचे वातावरण निर्माण होऊ शकते. पर्यावरणीय दृष्ट्याही धोका मोठा आहे. तेल टँकरवर हल्ले झाल्यास मोठ्या प्रमाणात तेलगळती होऊ शकते, ज्यामुळे समुद्री पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होतो. जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम – ऊर्जा ही आधुनिक अर्थव्यवस्थेची जीवनरेखा आहे. तेलाच्या किंमती वाढल्यास वाहतूक खर्च वाढतो. उद्योग उत्पादन महाग होते. महागाई वाढते. त्यामुळे जगभरातील अर्थव्यवस्थांवर त्याचा परिणाम होतो. युरोप, चीन, जपान आणि भारत यांसारख्या मोठ्या ऊर्जा आयात करणाऱ्या देशांना याचा मोठा फटका बसू शकतो. भारतावर परिणाम – भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा तेल वापरणारा देश आहे. भारताच्या ऊर्जा गरजांपैकी सुमारे ऐंशी ते नव्वद टक्के कच्चे तेल आयात केले जाते. एलपीजी आणि नैसर्गिक वायूचा मोठा हिस्सा देखील आयातीवर अवलंबून आहे. या आयातीचा मोठा भाग पश्चिम आशियातील देशांकडून येतो. त्यामुळे पर्शियन गल्फ प्रदेशातील कोणताही तणाव भारतासाठी चिंतेचा विषय ठरतो. भारतामध्ये पेट्रोलियम उत्पादने वाहतूक, उद्योग, शेती आणि घरगुती वापरासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. घरगुती स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या एलपीजी सिलिंडरचा वापर ग्रामीण आणि शहरी भागात मोठ्या प्रमाणात होतो. जर होरमुझ सामुद्रधुनीतील वाहतूक अडथळली तर भारतातील ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. भारत सरकारचे उपाय – ऊर्जा सुरक्षिततेसाठी भारताने काही महत्त्वाचे उपाय सुरू केले आहेत. रणनीतिक पेट्रोलियम साठे तयार करण्यात आले आहेत. तसेच तेल आयात विविध देशांकडून करण्यावर भर दिला जात आहे. रशिया, आफ्रिका आणि अमेरिका यांसारख्या देशांकडून तेल आयात वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याशिवाय सौर ऊर्जा, जैवइंधन आणि हरित हायड्रोजन यांसारख्या पर्यायी ऊर्जा स्रोतांवर भर दिला जात आहे. ऊर्जा बचत आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी देखील विविध धोरणे राबवली जात आहेत. संकट किती काळ टिकू शकते – आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या मते, संघर्ष लवकर संपला तरी पुरवठा पूर्ववत होण्यासाठी काही आठवडे किंवा महिने लागू शकतात. जहाज वाहतूक, विमा, बंदर व्यवस्थापन आणि बाजारातील अस्थिरता यामुळे ऊर्जा बाजार स्थिर होण्यासाठी वेळ लागतो. अमेरिका–इराण संघर्ष हा केवळ दोन देशांमधील वाद नाही. तो जागतिक ऊर्जा राजकारण, समुद्री व्यापार आणि आंतरराष्ट्रीय संबंधांवर परिणाम करणारा महत्त्वाचा भूराजकीय प्रश्न आहे. होरमुझ सामुद्रधुनी हा जगाच्या ऊर्जा पुरवठ्याचा कणा आहे. त्यामुळे या प्रदेशातील कोणतीही अस्थिरता संपूर्ण जगासाठी चिंता निर्माण करते. भारतासारख्या ऊर्जा आयातीवर अवलंबून देशांसाठी हा संघर्ष ऊर्जा धोरणाचे पुनर्मूल्यांकन करण्याची संधी आणि आव्हान दोन्ही आहे. ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण, पर्यायी ऊर्जेचा विकास आणि रणनीतिक साठे वाढवणे ही काळाची गरज आहे. दीर्घकालीन स्थैर्यासाठी पश्चिम आशियात शांतता आणि सहकार्य आवश्यक आहे.

**●चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**

## बीडमध्ये वंचित बहुजन आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक; संघटन मजबूत करण्यावर भर, विविध प्रश्नांवर आंदोलनाचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

**आज दि. ८ मार्च रोजी सकाळी १२ वाजता बीड येथील शासकीय विश्रामगृहात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस जिल्हा, तालुका व शहर पातळीवरील पदाधिकारी, आजी–माजी कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.**

बैठकीदरम्यान संघटनात्मक बांधणी अधिक भक्कम करण्यावर विशेष भर देण्यात आला. जिल्हाभरात वंचित बहुजन आघाडीच्या शाखा स्थापन करून पक्षाची ताकद वाढविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी विविध जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली असली तरी स्मशानभूमीचा प्रश्न हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणून बैठकीत केंद्रस्थानी होता. अनेक ठिकाणी स्मशानभूमीची जागा नसणे, अपुरी सुविधा तसेच नागरिकांना होणाऱ्या अडचणी याबाबत पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. हा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक पावले उचलली नाहीत तर येत्या काळात तीव्र आंदोलन उभारण्याचा सर्वानुमते निर्णय बैठकीत घेण्यात आला. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सर्वसामान्य नागरिकांशी संबंधित इतर प्रलंबित मुद्द्यांवरही चर्चा करून त्यासाठी संघटितपणे लढा देण्याची भूमिका व्यक्त करण्यात आली. बैठकीत सर्व तालुकाध्यक्षांनी आपल्या तालुक्यातील परिस्थिती व समस्या मांडत संघटन बळकट करण्याबाबत मते व्यक्त केली. उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनीही आपापल्या सूचना मांडल्या. यावेळी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीची जिल्हा कार्यकारिणी, तालुका कार्यकारिणी तसेच विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चकलांबा पोलिसांची कारवाई: ३७ लाखाचा मुद्देमाल जप्त

### पदभार स्वीकारताच सपोनि इंगळे यांची धडाकेबाज कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

**चकलांबा पोलीस पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर दोन दिवसातच साहेब पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांनी आपल्या सहकारी पोलिसांच्या पथकासह विविध ठिकाणी धाडसत्र सुरू केले. बुद्ध वाळू वाहतूक बेकायदेशीर दारू विक्री आणि जुगार धंद्याविरुद्ध त्यांनी कठोर मोहीम उघडून पाच ठिकाणी कारवाई केली आहे.**

दि. १४ मार्च रोजी चकलांबा गावात जुगारावर कारवाई करुन मोटार सायकल, मोबाईल व रोख रक्कम मिळून १,०७,९२०/– चा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये ५ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करीत आहे. या कारवाईत अमजद फरीद पठाण



रा. रुबाबदार ता. गेवराई, दिलीप विष्णु दौंड रा. चकलांबा, पोपट विठ्ठलराव खेडकर रा. चकलांबा, दिनकर मुरलीधर तांगडे रा. चकलांबा व अन्य एका अनोळखी इस्म विरुद्ध कारवाई करण्यात आली. अवैध दारू विक्री विरुद्ध धाडीत रुपये ५, २५०/– चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बहुचर्चेत असलेल्या राक्षसभुवन शिवारात अवैध वाळू वाहतूक करतांना हायवा पकडला. सदर हायवा व ४ ब्रास वाळू असा एकूण रुपये ३५, २४,००० चा मुद्देमाल जप्त केला आहे. उमापूर गावात सोरट खेळणाऱ्या ६ इसमांवर छापा टाकून रू. २०,१६०/– रोख व इतर साहित्य रू. ८०,५००/– असा एकूण रु.१,००,६६०/– चा मुद्देमाल जप्त केला आहे. या घटनेत १)संभाजी राजु शिंदे रा. बालम टाकळी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर, २) आसिफ नसिर शेख रा. बोधेगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर, ३) शेषराव यशवंत कापसे रा. उमापूर ४) अमोल बाबुराव हवाले रा. उमापूर, ५) आकाश वसंत गायकवाड रा. उमापूर, ६) हकीम खलील पठाण रा. उमापूर या वृद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. सदर कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे, स.फौ. चांदमारे, पोह. प्रधान, पो.ह. पवार व त्यांच्या सहकारी पोलिसांनी केली आहे.

## पान १ वरून...

### हरभऱ्याची हमीभावाने खरेदी

ई–पीक पाहणीची अट कायम राहिल्यास अनेक शेतकरी हमीभाव खरेदीपासून वंचित राहतील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. तसेच शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा,अशी मागणी शेतकरी वर्गातून होताना दिसत आहे. यंदा हरभऱ्याचा हमीभाव साधारण ५,८७५ रु. प्रति क्विंटल असून, शेतकऱ्याने पेरलेल्या क्षेत्रानुसार ठरावीक प्रमाणातच हरभरा खरेदी केला जातो.

-----------

### बारामती व राहुरीची

पोटनिवडणूकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होईल व ४ मे रोजी निकाल जाहीर होणार आहे. अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे ६ वेळा आमदार राहिलेले दिग्गज नेते शिवाजीराव कार्डिले (वय ६७) यांचे ऑक्टोबर २०२५ मध्ये अल्पशा आजाराने निधन झाले होते. यामुळे ही जाग रिक्त झाली होती आता या जागेसाठी पोट निवडणूक होणार आहे.

------------

### पाच राज्यांमधील विधानसभा

आणि २३ एप्रिलला मतदान होईल. दुसऱ्या टप्प्यात (१४२ जागा) २ एप्रिलला अधिसूचना निघेल, ९ एप्रिलपर्यंत अर्ज भरता येतील आणि २९ एप्रिलला मतदान होईल. दोन्ही टप्प्यांसाठी अर्जांची छाननी अनुक्रमे ७ आणि १० एप्रिलला होईल, तर निकाल ४ मे रोजी एकत्रितपणे जाहीर केला जाईल. आसाममधील विधानसभा निवडणुकीची अधिसूचना १६ मार्च रोजी जाहीर होईल. उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २३ मार्च असून, २४ मार्च रोजी अर्जांची छाननी केली जाईल. अर्ज मागे घेण्यासाठी २६ मार्च पर्यंत मुदत असेल. केरळम विधानसभेसाठी निवडणूक प्रक्रिया १६ मार्च रोजी अधिसूचनेने सुरू होईल. नामांकन दाखल करण्याची अंतिम तारीख २३ मार्च असून छाननी प्रक्रिया २४ मार्च रोजी पार पडेल. उमेदवारांना आपले नाव २६ मार्च पर्यंत मागे घेता येईल. तमिळनाडूमध्ये निवडणूक अधिसूचना ३० मार्च रोजी प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ६ एप्रिल पर्यंत वेळ असेल आणि ७ एप्रिल रोजी अर्जांची छाननी केली जाईल. अर्ज मागे घेण्याची मुदत ९ एप्रिल पर्यंत आहे. पुदुचेरी केंद्रशासित प्रदेशासाठी १६ मार्च रोजी अधिसूचना काढली जाईल. इच्छुकांना २३ मार्च पर्यंत आपले उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. त्यानंतर २४ मार्च रोजी अर्जांची तपासणी होईल आणि २६ मार्च पर्यंत अर्ज मागे घेता येतील.

-----------

### पोलीस पाटील, ग्रामसेवकावर

माध्यमातून समोर आली आहे. राज्य महिला आयोगाने याची दखल घेतली असून तपास अधिकाऱ्यांशी फोनवरुन संवाद साधला. आता, पीडित अल्पवयीन महिलेच्या विवाहावरुनही गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी प्रकरणाचे तपास अधिकारी अतुलकुमार लांडगे यांना दूरध्वनीवरून सूचना दिल्या आहेत. सद्यस्थितीत पीडित महिलेच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम १३७(२),३३३,६४(२) आणि पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी वैभव पटेकर याला अटक करण्यात आली आहे. या तपासा दरम्यान पीडित मुलीचा गेल्याच वर्षी बालविवाह लावून देण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. या बालविवाहाच्या दृष्टीनेही गुन्हा दाखल करून लग्न लावून देणारे, लग्नास उपस्थित असणारे, पोलीस पाटील, ग्रामसेवक अशा संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश आयोगाच्या अध्यक्षा अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी पोलीस प्रशासनाला दिले आहेत.

१० मार्च रोजी रात्रीच्या सुमारास पीडित महिला आपल्या पतीसोबत घरी झोपलेली होती. मध्यरात्रीच्या सुमारास आरोपी घरात शिरला. त्याने महिलेचे तोंड दाबून तिला जबरदस्तीने घराबाहेर नेले. त्यानंतर तिला गावाजवळ असलल्या नदीपात्रात नेत तिच्यावर अत्याचार केला असल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर आरोपीने पीडित महिलेला गावातील चावडीत आणून दोरीनं आणि कपड्यानं बांधून ठेवलं आणि तेथून पसार झाला. काही वेळानंतर शुद्धीवर आल्यानंतर पीडितेने मदतीसाठी आवाज दिला, मात्र सुरुवातीला तिला कोणीही मदत केली नाही. नंतर तिच्या नातेवाईकांना याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेत तिला तिथून सोडवून घरी नेलं. घटनेनंतर आरोपीच्या भीतीमुळे पीडितेने दोन दिवस हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. मात्र, शेवटी तिने हिम्मत करून आई आणि मामासोबत पिंपळनेर पोलिस ठाण्यात जाऊन याबाबत तक्रार दाखल केली. त्यानंतर, आरोपी वैभव पटेकर यास अटक करण्यात आली असून १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

------------

### धाराशिव– लातूर– तुळजापूर

जोरात आदळली. या तिहेरी धडकेत तिन्ही वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला असून त्यांचे मृतदेह बाहेर काढताना बचाव पथकाला मोठी कसरत करावी लागली. अपघातातील चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी धाराशिव आणि सोलापूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता डॉक्टरांनी वर्तवली आहे. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली होती. क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात आली होती. महामार्गावर रक्ताचा सडा पडलेला पाहायला मिळाला. वाहनांच्या तुटलेल्या भागांमुळे अपघाताची भीषणता स्पष्टपणे दिसून येते.

------------

### गॅसधारकांचा सिलिंडर पुरवठा बंद

त्यातच केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून आता पीएनजी (पाईपद्वारे गॅस) कनेक्शन असलेल्यांना गॅस सिलिंडर वापरता येणार नाही. पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयाने हा आदेश जारी केला आहे. केंद्रीय मंत्रालयाने स्पष्ट केले की, ज्या लोकांकडे पाईपने गॅस पुरवठा होतो, त्या नागरिकांना आता गॅस सिलिंडरचे कनेक्शन सोडावे लागणार आहे. ज्यांच्याकडे पाईपद्वारे गॅसचे कनेक्शन आहे, ते सरकारी डिस्ट्रीब्यूटर्सकडून सिलिंडरसाठी पुरवठा प्राप्त करू शकणार नाहीत. पीएनजी आणि एलपीजी गॅस कनेक्शन एकत्र ठेवल्याने गॅस पुरवठ्यामध्ये असमानता, काळाबाजार आणि अनावश्यक दुहेरी वापराने अडचण निर्माण होते. त्यामुळेच ग्राहकांना एकाच गॅस कनेक्शनद्वारे घरगुती गॅसचा पुरवठा केला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अशा ग्राहकांना आता नवीन सिलेंडरचे रिफिल बुकिंग करता येणार नाही. भविष्यातही पीएनजी वापरकर्त्यांना नवीन एलपीजी कनेक्शन घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. ज्या घरांमध्ये पाईप गॅसची सुविधा उपलब्ध आहे त्यांनी एलपीजी सिलेंडरचा वापर थांबवावा, असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

----------

### सौरउर्जा प्रकल्पामध्ये

आहे. देशात या कालावधीत प्राप्त अर्जापैकी एकूण ५ लाख ५७ हजार २२४ घरगुती ग्राहकांकडे सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले. त्यांपैकी १९ टक्के प्रकल्प महाराष्ट्रात बसविण्यात आले. १ ऑक्टोबर २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जापैकी किती अर्जदारांच्या घरी सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले, याचा विचार करण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश (९५ हजार ६६५), गुजरात (९४ हजार ३६४), राजस्थान (३९ हजार ४८४) व केरळ (३६ हजार ८३६) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या क्रमांकांवर आहेत. महिना ३०० युनिटपर्यंत वीजवापर असलेल्या घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य व्हावे, अतिरिक्त वीज विकून त्यांना उत्पन्नही मिळावे यासाठी ही योजना सुरू आहे. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज निर्माण होते. छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्पातून ग्राहकांच्या गरजेपेक्षा जास्त वीज निर्माण झाल्यामुळे त्याचे बिल शून्य होते. अतिरिक्त वीज विकून त्याला उत्पन्नही मिळते. एकदा सौरऊर्जा प्रकल्प बसविला की त्यातून २५ वर्षे वीजनिर्मिती होते.

-------------

### मुख्यमंत्री फडणवीस यांना

राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व कृषीमंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेचे (आयसीएआर) माजी संचालक डॉ. अशोक कुमार सिंह, कुलगुरू डॉ. विलास खर्चे व राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे उपस्थित होते. राज्यपाल जिष्णू देव वर्मा म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' याबरोबरच 'जय अनुसंधान' घोषणा दिली आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हवामान बदल, तांत्रिक प्रगती व बदलते जागतिक परिदृश्य यामुळे कृषी क्षेत्रात दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व नवकल्पनांची गरज आहे. नैसर्गिक व शाश्वत शेती पद्धतींच्या प्रसारात तसेच देशातील पहिले 'रिमोट पायलट ट्रेनिंग ऑर्गनायझेशन' स्थापन करण्यात विद्यापीठाने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या विद्यापीठात होत असलेल्या प्रभावी अंमलबजावणीबाबत समाधान व्यक्त करून राज्यपाल जिष्णू देव वर्मा म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता कृषी नवकल्पना व उद्योजकता स्वीकारावी. राज्य शासन कृषी क्षेत्रातील नवकल्पना व ग्रामीण विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यास कटिबद्ध आहे, असेही नमूद केले.

--------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. १६ मार्च २०२६


## थोडक्यात



### यांत्रिकीकरणाने शेती समृद्ध करा-जितेंद्र पापळकर

**बीड । प्रतिनिधी**

तळेगाव छत्रपती शिवाजी महाराज महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत तळेगाव येथे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी प्रतिपादन केले महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्या वतीने या अभियानामध्ये राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अनुदानावर वाटप केलेल्या अवजाराचे वितरण माननीय विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहमान उपजिल्हाधिकारी हरीश धार्मिक व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्या हस्ते ट्रॅक्टर व रोटावेटर चे वितरण उत्तरेश्वर घोलप ,श्रीपती घोलप ,नितीन बागलाने ,श्रीराम घाडगे यांना करण्यात आले यावेळी पापळकर कृषी विभागातील विविध योजनेचा लाभ घेऊन तसेच यांत्रिकीकरण वाढवून शेती उत्पादनात वाढ करण्याबाबत मार्गदर्शन केले यावेळी स्टॉल मधून महाविस्तार या प शेतकऱ्यांना डाऊनलोड करून देण्यात आले यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके मंडळ कृषी अधिकारी दत्त गणेश माळी उप कृषी अधिकारी प्रशांत नाळपे सतीश मिटकरी सुहास जोगदंड सहाय्यक कृषी अधिकारी एस एस तळेकर विकास सोनवतीकर बाळासाहेब आघाव संजय गावडे सरिता शिंदे नम्रता थोरात सह कृषी विभागातील अनेक कर्मचारी उपस्थित होते



### सांची बुद्ध विहारात बौद्धाचार्य श्रामणेर शिबिराचे उदघाटन

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव तालुक्याच्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापूरी कॅम्प येथे दि २१ मार्च रोजी होत आसलेल्या भव्य धम्म मेळाव्याच्या अनुशंगान बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचे तसेच बाभळगाव व कल्याणनगर या ठीकाणी महिला उपासिका शिबीराचे आयोजन करण्यात आले त्या श्रामणेर शिबीराचे उदघाटन दि १३ मार्च रोजी करण्यात आले त्या शिबीरासाठी संघनायक म्हणुन पुज्य भन्ते डॉ बी सारीपुत्त महाथेरो यांनी शिबीरार्थी ना श्रामणेर दिक्षा दिली या शिबीरासाठी केंद्रिय शिक्षक म्हणुन डॉ युवराज मोरे नांदेड हे आहेत या शिबीराचे उदघाटन भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व चे अध्यक्ष आद.ॲड. बी बी धन्वे यानी केले तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे बीड पुर्व च्या महिला अध्यक्षा कमलताई डोंगरे,सरचिटणीस आद.डॉ संतोष बोबडे ,संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,आशाताई मोरे,हे उपस्तीत होते.

## मतदार यादी पडताळणी प्रक्रियेत नागरिकांनी संभ्रम बाळगू नये - तहसीलदार शेळके

बीड । प्रतिनिधी

लोकशाही व्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा पाया म्हणजे मतदानाचा अधिकार . नागरिकांनी आपल्या प्रतिनिधींची निवड करण्यासाठी दिलेला मताचा अधिकार हा लोकशाहीच्या बळकटीसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो . या संपूर्ण प्रक्रियेचा आधार असतो तो म्हणजे मतदार यादी . मतदार यादी अचूक , अद्ययावत आणि पारदर्शक राहणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे . त्यामुळे भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी मतदार यादीचे पुनरावलोकन , सुधारणा आणि अद्ययावत प्रक्रिया राबविली जाते.

सध्या मतदार यादी पडताळणी व विशेष सघन पुनरावलोकन ( एस आय आर ) प्रक्रियेबाबत काही नागरिकांमध्ये संभ्रम किंवा भीती निर्माण झाल्याचे दिसून येत आहे . काही ठिकाणी अपुरी किंवा चुकीची माहिती पसरत असल्याने मतदारांमध्ये अनावश्यक गैरसमज निर्माण होत आहेत . प्रत्यक्षात ही प्रक्रिया नागरिकांच्या मतदान हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि मतदार यादी अधिक अचूक करण्यासाठी राबविली जात आहे . त्यामुळे नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता प्रशासनाला सहकार्य करावे , असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. भारतामध्ये मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया भारतीय संविधान आणि जनप्रतिनिधी कायदा १९५० व १९५१ अंतर्गत ठरविण्यात आलेली आहे . भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक राज्यात मतदार यादी तयार केली जाते . जिल्हाधिकारी हे संबंधित जिल्ह्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहतात . त्यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , नायब तहसीलदार तसेच मतदान केंद्र स्तरावर नियुक्त करण्यात आलेले केंद्रस्तरीय अधिकारी हे मतदार नोंदणी आणि पडताळणीचे काम करतात . मतदार यादी तयार करताना नागरिकांचे नाव , पत्ता , वय , मतदान केंद्र तसेच इतर आवश्यक तपशील नोंदविले जातात . नागरिकांचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना मतदार म्हणून नोंदणी करता येते . या प्रक्रियेमुळे प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळतो .

लोकसंख्या वाढ , स्थलांतर , मृत्यू किंवा नवीन मतदारांची नोंदणी यामुळे मतदार यादी वेळोवेळी बदलत राहते . त्यामुळे भारत निवडणूक आयोगाकडून नियमितपणे मतदार यादी पुनरावलोकन प्रक्रिया राबविली जाते . या प्रक्रियेत नवीन मतदारांची नोंदणी , मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे , मतदारांच्या तपशीलात सुधारणा , मतदान केंद्रांची पुनर्रचना तसेच डिजिटल मतदार यादी अद्ययावत करणे या महत्त्वाच्या बाबींची अंमलबजावणी केली जाते . यामुळे मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक राहते. मतदार यादी अधिक अचूक करण्यासाठी वेळोवेळी विशेष सघन पुनरावलोकन प्रक्रिया राबविली जाते . या प्रक्रियेत जुन्या मतदार यादीतील नोंदी तपासून त्या अद्ययावत करण्याचे काम केले जाते . मात्र सध्या प्रत्यक्ष पुनरावलोकन प्रक्रिया सुरू झालेली नसून त्याची पूर्वतयारी सुरू आहे . या टप्प्यात २००५ सालातील मतदार यादी आणि २०२४ – २५ मधील विद्यमान मतदार यादी यांचे परस्पर जुळवणीचे काम चालू आहे .

बीड तालुका हा बीड , गेवराई आणि केज या विधानसभा मतदारसंघांमध्ये विभागलेला आहे . आजच्या घडीला बीड



तालुक्याची एकूण मतदार संख्या ४ , ५१ , २२५ इतकी आहे . त्यामध्ये पुरुष मतदार २ , ३७ , ६४४ असून स्त्री मतदार २ , १३ , ५६९ आहेत . सध्या तालुक्यात ४५७ मतदान केंद्रांच्या माध्यमातून मतदारांचे मतदार ते मतदार आणि मतदार ते कुटुंब अशा पद्धतीने जुळवणीचे काम सुरू आहे .

ज्या मतदारांचे जुळवणीचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही अशा मतदारांची स्वतंत्र यादी तयार करण्यात येत आहे . प्रत्यक्ष सघन पुनरावलोकन प्रक्रियो सुरू झाल्यानंतर सर्व केंद्रस्तरीय अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रातील गाव , प्रभाग आणि मतदान केंद्र क्षेत्रात जाऊन प्रत्येक मतदाराच्या कुटुंबाशी संपर्क साधतील . त्या वेळी २००५ च्या मतदार यादीतील संदर्भ तपासले जातील आणि मतदारांची नोंद परस्पर जुळवणीद्वारे जोडली जाईल . जर त्यानंतरही काही मतदारांची जुळवणी होऊ शकली नाही , तर अधिकारी पुन्हा घरभेट देऊन संबंधित मतदारांकडून निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या तेरा ओळखपत्रांपैकी एक ओळख पुरावा स्वीकारतील आणि आयोगाच्या विहित नमुन्यातील अर्ज भरून घेतील .

या संपूर्ण प्रक्रियेमध्ये कोणताही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये याची विशेष दक्षता प्रशासनाकडून घेतली जात आहे . त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये , असे आवाहन करण्यात आले आहे .

निवडणूक आयोगाने नागरिकांना माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी विशेष मोबाईल अनुप्रयोग उपलब्ध करून दिला आहे . या माध्यमातून नागरिकांना जुनी मतदार यादी तपासता येते . अनुप्रयोगामध्ये मतदार नोंदणी अर्ज , मागील पुनरावलोकनातील नाव शोधा आणि मतदार तपशीलाच्या आधारे शोधा असे पर्याय उपलब्ध आहेत . नाव सापडल्यानंतर त्यातील मतदारसंघ , भाग क्रमांक आणि अनुक्रमांक ही माहिती संबंधित केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडे दिल्यास पुढील प्रक्रिया सुलभ होते .

बीड जिल्ह्यात मतदार यादी पडताळणीचे काम जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे . निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी मनोज घोडे पाटील यांच्या समन्वयातून संपूर्ण जिल्ह्यातील निवडणूक यंत्रणा कार्यरत आहे . बीड उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरावर पडताळणी प्रक्रिया प्रभावीपणे राबविली जात आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनीही नागरिकांशी संवाद साधत मतदार नोंदणी आणि पडताळणी प्रक्रियेत सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.बीड तहसील कार्यालयाच्या माध्यमातून मतदार यादी पडताळणीचे काम वेगाने सुरू आहे . निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार सुरेंद्र डोके यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण पथक कार्यरत आहे . तलाठी , मंडळ अधिकारी , महसूल कर्मचारी आणि केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या समन्वयातून मतदार माहिती पडताळणीचे काम सुरू आहे . मतदान केंद्र स्तरावर काम करणारे केंद्रस्तरीय अधिकारी हे निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत . ते घरभेटी घेऊन माहिती पडताळणी करतात , नवीन मतदारांची नोंद करतात , मृत किंवा स्थलांतरित मतदारांची माहिती घेतात तसेच मतदारांना मार्गदर्शन करतात . त्यांच्या प्रयत्नांमुळे मतदार यादी अधिक अचूक आणि विश्वासार्ह बनते .

## पाटोद्यात भक्तिमय चैतन्य! ३६०० कि.मी.ची खडतर नर्मदा परिक्रमा पूर्ण करून लक्ष्मण महाराज सस्ते यांचे आगमन

### भव्य मिरवणुकीने पाटोदा नगरी दुमदुमली

**पाटोदा । प्रतिनिधी**

अध्यात्मिक साधनेचा वारसा जपणाऱ्या आणि भक्तीची ओढ उराशी बाळगणाऱ्या पाटोदा तालुक्यातील बांगरवाडी येथील तरुण कीर्तनकार ह.भ.प. लक्ष्मण महाराज सस्ते यांनी आपली ३६०० किलोमीटर अंतराची अत्यंत खडतर अशी 'नर्मदा परिक्रमा' यशस्वीपणे पूर्ण केली आहे. परिक्रमा पूर्ण करून पाटोदा शहरात आगमन होताच त्यांचे अभूतपूर्व स्वागत करण्यात आले. या निमित्ताने आयोजित 'दिव्य मिरवणूक व दर्शन सोहळ्या'ने संपूर्ण पाटोदा नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली होती.

साधनेचा खडतर प्रवास

मध्य प्रदेशातील ओंकारेश्वर येथून महासिद्ध योगी दादा गुरुंच्या मार्गदर्शनाखाली लक्ष्मण महाराज यांनी या पवित्र परिक्रमेला सुरुवात केली होती. अनेक महिने चाललेला हा पायी प्रवास, निसर्गाची आव्हाने आणि कडक शिस्त पाळत त्यांनी ही ३६०० किलोमीटरची प्रदक्षिणा पूर्ण केली. नर्मदा मातेच्या चरणी लीन होऊन केलेली ही साधना केवळ वैयक्तिक नसून, त्यामागे समाजप्रबोधनाचाही मोठा संकल्प होता.

मिरवणुकीत जनसागराचा उलोट



महाराज परिक्रमा पूर्ण करून परतल्याच्या आनंदात पाटोदा ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविकांनी भव्य मिरवणुकीचे आयोजन केले होते. फुलांनी सजवलेली पालखी, टाळ-मृदंगाचा गजर आणि 'नर्मदे हर'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि पुष्पवृष्टी करून महाराजांचे स्वागत करण्यात आले. या सोहळ्याने पाटोद्यात जणू एखादी मोठी जत्रा किंवा दिंडी असल्याचे वातावरण निर्माण झाले होते.

मान्यवरांची मांदियाळी

या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून महाराजांचे दर्शन घेतले. यामध्ये माजी आमदार सुरेश (आण्णा) धस यांनी प्रामुख्याने उपस्थित राहून लक्ष्मण महाराज सस्ते यांचा सत्कार केला. यावेळी बोलताना त्यांनी महाराजांच्या या कडक तपश्चर्येचे आणि भक्तीचे कौतुक केले. यासोबतच तालुक्यातील विविध क्षेत्रांतील लोकप्रतिनिधी, वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

साधनेसोबत समाजप्रबोधन

लक्ष्मण महाराज सस्ते हे तरुण कीर्तनकार म्हणून परिचित आहेत. नर्मदा परिक्रमेच्या दरम्यान त्यांनी ठिकठिकाणी भेटी देत धर्माचरण आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण पाटोदा तालुक्यातून त्यांचे कौतुक होत आहे. तरुणांसाठी त्यांची ही साधना प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी अनेक ज्येष्ठांनी व्यक्त केले. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी पाटोदा ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील तरुण मंडळांनी विशेष परिश्रम घेतले.

## वनविभागाने कृत्रिम पाणवठे पाण्याने भरले

### डॉ. गणेश ढवळे यांच्या पाठपुराव्यानंतर टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावरील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी व सोमनाथवाडी परिसरातील वनक्षेत्रात वनविभागाने उभारलेले कृत्रिम पाणवठे कोरडे पडल्याने वन्यजीवांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. पाण्याच्या शोधात हरीण व काळवीट यांसारखे वन्यप्राणी मानवी वस्तीकडे धाव घेत असल्याने कुत्र्यांच्या हल्ल्यात किंवा वाहनांच्या धडकेत जखमी होण्याच्या तसेच मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चिंताजनक स्थिती निर्माण झाली होती.



लिंबागणेश परिसरात गेल्या महिनाभरात एका काळवीटाचा जागीच मृत्यू झाला होता, तर दुसरे एक काळवीट गंभीर जखमी अवस्थेत आढळून आले होते. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी संबंधित कृत्रिम पाणवठ्यांना भेट देऊन पाहणी केली असता ते पूर्णपणे कोरडे असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी नियमितपणे कृत्रिम पाणवठ्यांमध्ये पाणीपुरवठा करावा, अशी मागणी त्यांनी केली होती. या संदर्भातील बातम्या विविध दैनिकांमधून प्रसिद्ध झाल्यानंतर वनविभागाने याची दखल घेतली.

वनविभागाचे अधिकारी महेश मेटे यांनी तत्काळ पावले उचलत संबंधित कृत्रिम पाणवठ्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. त्यामुळे वन्यजीवांना मोठा दिलासा मिळाला आहे.उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना पाण्यासाठी मानवी वस्तीकडे धाव घ्यावी लागू नये तसेच अपघातांमुळे त्यांचे जीवितहानी टळावी यासाठी वनविभागाने उन्हाळाभर कृत्रिम पाणवठ्यांमध्ये नियमित पाणीपुरवठा करावा, अशी अपेक्षा डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

## जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगावचा १०० टक्के निकाल

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यातर्फे नुकत्याच जाहीर झालेल्या बी.पी.टी. (इरलहशश्री `ष झहीूर्लेहशीरू) अंतिम वर्षाच्या परीक्षेत माजलगाव विकास प्रतिष्ठान संचलित जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, माजलगाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लावला आहे. महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचने हे घवघवीत यश मिळवल्याने संस्थेसह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सविस्तर वृत्त असे की,महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण होत आपले शैक्षणिक प्रशिक्षण पूर्ण केले असून ते आता डॉक्टर म्हणून समाजातील रुग्णांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहेत. ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचने



मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद मानले जात आहे.या यशानिमित्त महाविद्यालयात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशामागे महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांची मेहनत कारणीभूत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा मंगलाताई प्रकाश सोळंके यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांना घडविणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच आरोग्यसेवेच्या क्षेत्रात संवेदनशीलता, कौशल्य आणि समर्पणाने काम करण्याचे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले.जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या या उल्लेखनीय यशामुळे माजलगाव शहरासह बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल झाले आहे. पुढील काळातही अशाच प्रकारे गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन आरोग्य क्षेत्रासाठी सक्षम आणि कुशल फिजिओथेरपिस्ट घडविण्याचा संस्थेचा संकल्प असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा जल्लोष; आदित्य शिक्षण संस्थेच्या स्नेहसंमेलनाची उत्साहात सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा देखणा आविष्कार आणि उत्स्फूर्त सहभागाच्या वातावरणात येथील आदित्य शिक्षण संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची उत्साहात सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पारंपरिक नृत्य, देशभक्तीपर गीत, नाटिका, समूह सादरीकरणांनी स्नेहसंमेलनाच्या पहिल्या दिवसाला विशेष रंगत आणली. उपस्थित प्रेक्षकांची दाद मिळाली. आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडत आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला बीड शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे हे प्रमुख पाहुणे



म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा होते. यावेळी सीए गिरीश गिल्डा, आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा तसेच संचालिका डॉ. आदिती सारडा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबतच सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्नेहसंमेलनांचे मोठे महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.

या स्नेहसंमेलनात आदित्य शिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या विविध कोर्सेस मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळे कलाप्रकार सादर केले. उपस्थितांची दाद मिळाली. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व प्राचार्यांसह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी नियोजनपूर्वक परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसरात आनंददायी वातावरण निर्माण झाले. स्नेहसंमेलनाचे पुढील दिवसही विविध सांस्कृतिक, क्रीडा व शैक्षणिक कार्यक्रमांनी रंगणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. विवेक कुलकर्णी यांनी केली. सूत्रसंचालन संग्राम तनपुरे व प्रतीक्षा सुसर यांनी केले. आभार डॉ. अमोल सानप यांनी मानले.

**विविध अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा सहभाग**

या स्नेहसंमेलनाच्या पहिल्या दिवशी आदित्य शिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या दंत, आयुर्वेद, कृषी, कृषी अभियांत्रिकी, अन्नतंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, नर्सिंग, फिजिओथेरपी, जीएनएम, फार्मसी, डी. फार्मसी तसेच इतर अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सादर करत प्रेक्षकांची दाद मिळवली.



## मयत कर्जदारास कर्जाच्या विम्याची रक्कम मंजूर

माजलगाव । प्रतिनिधी

तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सो. लि च्या तीर्थपुरी शाखेचे सोनेतारण कर्ज खातेदार नरवडे गणेश सूर्यभान यांचे अपघाती अकाली निधन झाले असता.संस्थेने त्यांच्या गोल्ड लोन कर्जाचा २,१५०००/ रुपयांचा इन्शुरन्स मंजूर करून दिले व रक्कम कर्ज खाते जमा करून सोनेतारण तारण खाते बंद करण्यात आले.त्याच्या गहाण ठेवलेले दागिने वारसदार नरवडे किशोर गणेश यांच्याकडे श्री तुळजा भवानी अर्बनचे विभागीय अधिकारी सिद्धेश्वर शिंगणे व शाखा व्यवस्थापक प्रकाश फपाळ यांनी सुपूर्द केले.

## पान ६ वरुन...

### सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड

महामार्गाचे ऑगस्ट २० २२ मध्ये ड्रोन सर्वेक्षण झाले त्यानंतर सप्टेंबर २३ मध्ये नोटिफिकेशन प्रकाशित होण्याच्या दरम्यान या महामार्गावरील असेट्स मध्ये वाढ झाली आहे असा दावा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण केला असताना संबंधित गावातील शेतकऱ्यांनी सर्वेक्षण करताना अनेक ठिकाणी चुका झाल्या असून फळबागांचे मोघम स्वरूपात मूल्यांकन करण्यात आले असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे असे प्रतिपादन शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आले भूसंपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या मूल्यांकनाबाबत उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने सहानुभूतीने विचार करण्यात येणार असून रेडी रेकनर सह प्रचलित मूल्यदर याचा देखील विचार होणार असून शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याविषयी सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले यावेळी राष्ट्रीय ग्रीनफिल्ड महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पासाठी जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेतला नसला तरीही शेतकऱ्यांना आतापर्यंतचे व्याज देण्याचा प्राधिकरणाचा विचार असल्याचे सांगितले आष्टी तालुक्यातील नांदूर, बाळेवाडी, कुंबेफळ, खुंटेफळ, पुंडी, शिरापूर, निमगाव चोभा,धिर्डी, केळसांगवी, खानापूर चिखली वाळुंज पारगाव जोगेश्वरी या गावातील शेतकऱ्यांनी आपापली निवेदने सादर केली असून त्यावर सारासार विचार करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला घेण्याबाबत आपण जिल्हाधिकारी बीड यांचे पासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत चर्चा करून असे आश्वासन आ. सुरेश धस यांनी या गावातील शेतकऱ्यांना यावेळी दिले.

### माजी आ. भीमराव धोंडे यांच्या

महिन्यात मुस्लिम बांधव दिवसभर कडक उपवास (रोजा) पाळतात आणि सूर्यास्ताच्या वेळी रोजा सोडण्याच्या प्रक्रियेला 'इफ्तार' असे म्हटले जाते. या इफ्तारच्या निमित्ताने विविध धर्म व समाजातील नागरिक एकत्र येऊन स्नेहभोजन करतात. त्यामुळे समाजात बंधुभाव, सलोखा आणि एकोपा वाढीस लागतो.

या प्रसंगी आष्टी शहरासह पंचक्रोशीतील विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय नेते, समाजसेवक, व्यापारी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी एकत्रितपणे इफ्तार करून रमजान महिन्याच्या पवित्र वातावरणात परस्परांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमामुळे आष्टी परिसरात सामाजिक सलोखा आणि ऐक्याची भावना अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

### मुद्रा मोदी से मुजराच्या

पुनर्विचार करावा तसेच विविध संशयास्पद प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करावी, अशा मागण्या देखील करण्यात आल्या. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, बालाघाटावरील नेते सतीश पायाळ, अर्जुन जावंजाळ , राजेशकुमार जोगदंड, बाळासाहेब मोरे, गोरक्षनाथ कदम, रायचंद कापसे, रोशन धिवार, मयुर निर्मळ, दिनेश अविळे, रवि गायकवाड, बबलू गायकवाड, ओम करे, अशोक करडे, संजय ढोकने, दिपक भालेराव, विशाल इंगोले, नितीन पायाळ, मुना दुनघव, फुलचंद वारभवन, अर्जुन धनवे, लखन जोगदंड, मिलिंद सरपते आदी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. आंदोलन शांततेत पार पडले असून आंदोलकांच्या वतीने प्रशासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

### गॅस-इंधन टंचाईच्या अफवांवर

संभ्रम निर्माण होत असला तरी प्रत्यक्षात गॅस बुकिंग आणि वितरण प्रक्रिया नियमित सुरू आहे. काही ठिकाणी तांत्रिक कारणांमुळे किरकोळ विलंब होऊ शकतो; मात्र त्यामुळे टंचाई निर्माण झाल्याचे समजणे चुकीचे असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. यासंदर्भात विनायक रत्नपारखी म्हणाले की, जिल्हा प्रशासनाने अधिकृत पत्रकाद्वारे परिस्थिती स्पष्ट केली असून नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे. कोणत्याही अप्रमाणित माहितीवर किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये. विनाकारण जास्तीचे गॅस सिलेंडर खरेदी करणे किंवा इंधनाचा साठा करणे टाळावे, असेही त्यांनी सांगितले. तसेच काही ठिकाणी नियमबाह्य पद्धतीने गॅस सिलेंडर साठवणूक केल्याची माहिती मिळाल्यास पुरवठा विभागाकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांपासून दूर राहून संयम बाळगावा, असे आवाहन विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

### होळ येथील आरोग्य तपासणी

किरण पोटभरे, सिद्धवी सोनटक्के वैष्णवी,शितल ठोंबरे लता शिंदे,रोहिणी शिंदे आदी जणांनी सहकार्य केले.शिबिरासाठी गावाचे सरपंच योगेश भैया शिंदे, उपसरपंच बाळासाहेब घुगे, नारायण आबा शिंदे, ग्रामपंचायत सदस्य तानाजी दादा, संदीपान घुगे, अशोक घुगे, ड. राजेभाऊ शिंदे, संग्राम भैय्या शिंदे, प्रसिद्ध वक्ते दत्ता घुगे, गावातील ज्येष्ठ मंडळी व ग्रामपंचायतचे सर्व कर्मचारी व लालासाहेब शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.अशा आरोग्य शिबिरांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

### गिनीज बुक फेम ह.भ.प.रामकृष्ण

ह.भ.प.सानप महाराज,डॉ.संजय तांदळे,प्रा.आर.टी. गर्जे, नारायण नागरे, प्रा. बाळासाहेब नागरगोजे, डॉ. लक्ष्मण पवळ, हिरामण तांदळे आणि रवींद्र मुंडे यांच्यासह राजकीय, सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक प्रतिष्ठित मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

शनिवार, दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत ह.भ.प. भगवान महाराज राजपूत यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने या सप्ताहाची सांगता झाली.अत्यंत भक्तीमय आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडलेल्या या सांगता समारंभानंतर निमंत्रित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. सप्ताहाच्या निमित्ताने संपूर्ण आष्टीनगरी विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेली होती.

### गजानन विद्यालयाच्या

पथकाच्या माध्यमातून देशभक्तीचे प्रदर्शन करून सहभाग नोंदवला. याचे प्रमुख पाहूण्यांनी कौतुक करून गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत पौळ यांच्या कार्याची प्रशंसा करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, तालुका शिक्षणाधिकारी समंदर खान यांनी या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शाळेला प्रवृत्त केले. यावेळी सव महसूल मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व तहसील कार्यालय बीडचे कर्मचारी उपस्थित होते.

### जातीच्या भिंती तोडा

निर्माण व्हावेत तसेच या परिवाराचा समाजाच्या विकासासाठी अधिकाधिक विस्तार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रज्वल म्हस्के यांनी केले, तर सूत्रसंचालन ज्ञानेश्वर सोळंके यांनी केले. यावेळी प्रकाश राजेभोसले, नंदिनी राजेभोसले, डॉ वैशाली काकडे, डॉ प्रियंका राजेभोसले, प्राचार्य अमित बिंदू, प्राचार्य मकेश बाबू आदींची उपस्थिती होती.

# कापूस पिशव्यांच्या खरेदीत गैरव्यवहार

## चौकशी अहवाल कृषी आयुक्तालयास सादर - कृषिमंत्री भरणे


पुणे : राज्यात बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्राम परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाअंतर्गत कापूस वेचणी आणि साठवणूक पिशव्यांच्या खरेदीत खरंच गैरव्यवहार झाला आहे का? याबाबत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी मोठा खुलासा केला आहे. यात अंदाजे तीन कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे ठोस निष्कर्ष शासनाच्या निदर्शनास आलेला नाही. तथापि, गुणवत्ता तपासणीदरम्यान पुरवठ्यातील नमुन्यांमध्ये तांत्रिक त्रुटी आढळून आल्या आहेत, असे कृषिमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत आमदार सदाभाऊ खोत यांनी विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित केले होते.

कापूस वेचणी आणि साठवणूक पिशव्यांच्या खरेदीत कृषी आयुक्तालयातील काही अधिकारी आणि ठेकेदार यांच्या संगनमताने अंदाजे तीन कोटीचा गैरव्यवहार झाल्याचे तसेच कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पुरवण्यात आलेल्या पिशव्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या असून त्यांची चढ्या दराने खरेदी करण्यात आल्याचे फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले. ही माहिती खरी आहे काय? असा प्रश्न खोत यांनी केला होता. त्यावर कृषिमंत्र्यांनी ही माहिती अंशतः खरी असल्याचे म्हटले आहे. सदर प्रकल्पांतर्गत कापूस



वेचणी आणि कापूस साठवणूक पिशव्या खरेदी ही राज्यस्तरावर प्रकल्प अंमलबजावणी कक्ष-कृषी तथा संचालक आत्मा यांच्यामार्फत एकत्रित निविदा प्रक्रियेद्वारे तसेच जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राष्ट्रीय खुली स्पर्धात्मक निविदा पद्धतीने करण्यात आली, असे कृषिमंत्र्यांनी म्हटले आहे. या प्रकरणी बाह्य लेखापरीक्षण अहवालामध्ये नमुना तपासणी, वितरण व देयक अदा प्रक्रियेबाबत आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. याबाबतच्या करारानुसार सदोष साहित्य बदलून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची असल्याने देयकांमध्ये कमी गुणवत्तेच्या प्रमाणात १७.५ टक्के कपात करून काही देयके अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. लेखापरीक्षकांनी या व्यवहारात आर्थिक अनियमितता झाल्याचे नमूद केले आहे. सदोष कापूस पिशवी खरेदीत साहित्य बदलून देण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची असूनदेखील त्याची अंमलबजावणी झालेली नाही. सदोष साहित्य वितरित करणाऱ्या ठेकेदाराला देयक अदा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय?, चौकशीत काय आढळून आले आणि चौकशीच्या अनुषंगाने करार उल्लंघन, गुणवत्ता चाचणी, प्रयोगशाळेच्या निवडीचा गैरप्रकार, गुणवत्ता चाचणी प्रक्रियेतील गोपनीयतेचा भंग, वित्तीय अनियमितता याबाबत दोषींवर कोणती प्रशासकीय कारवाई तसेच यासंदर्भात विद्यमान कृषी निविष्ठा व गुण नियंत्रक संचालक यांच्यावर सदर गैरव्यवहार प्रकरणी कोणती कारवाई करण्यात येत आहे? असे प्रश्न खोत यांनी उपस्थित केले होते. या प्रकरणी चौकशी केली असल्याचे कृषिमंत्र्यांनी म्हटले आहे. प्रकल्प अंमलबजावणी कक्ष-कृषी तथा संचालक आत्मा यांच्यामार्फत चौकशीअंती कापूस वेचणी पिशव्या खरेदी प्रक्रियेमध्ये झालेल्या अनियमितेबाबतचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी कृषी आयुक्तालयास सादर करण्यात आलेला आहे, असे त्यांनी नमूद केले आहे.

# आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे



ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

उभ्या उसातील पाचट काढण्याचे फायदे : उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.

उस पाचट काढताना घ्यायची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. उस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही. बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते. उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.

# तंत्र शिंगाडा उत्पादनाचे...

शिंगाडा हे उपवासाच्या काळात विशेष मागणी असलेले पीक आहे. शिंगाड्याची लागवड प्रामुख्याने उष्ण आणि समशीतोष्ण प्रदेशात तलाव, शेततळे, तसेच भातपिकाच्या खाचरांमध्ये केली जाते. सद्यःस्थितीत ज्या शेतकऱ्यांच्या शेततळ्यात पाणी आहे त्यांना या पिकाची लागवड करता येते. शिंगाड्याच्या फळामध्ये अनेक आयुर्वेदिक गुणधर्म असतात. फळाची जाडी दोन सेंटिमीटर इतकी असते. फळाचा गर मऊ असतो व चव किंचित गोड असते. शिंगाड्याचे कंद व फळांना उपवासामध्ये विशेष मागणी आहे. शेतकऱ्यांना चांगले आर्थिक उत्पन्न देणाऱ्या या पिकाची लागवड फायदेशीर ठरू शकते.

जाती : सद्यःस्थितीत हिरव्या, लाल किंवा जांभळ्या रंगांचे टरफल असलेल्या स्थानिक जातींची लागवड केली जाते. कानपुरी, जैनपुरी, देशी छोटे किंवा मोठे असे शिंगाड्याचे काही प्रकार आहेत. पश्चिम बंगाल आणि भारताच्या पूर्व भागात या जातींची लागवड केली जाते. अभिवृद्धी शिंगाड्याची व्यावसायिक पद्धतीने लागवड बियाण्याद्वारे केली जाते. पूर्ण पिकलेले शिंगाड्याचे फळ एका भांड्यामध्ये थोडे पाणी टाकून त्यात उगवण्यासाठी ठेवावे. काही दिवसांनी त्याला कोंब फुटतात. कोंब फुटलेले शिंगाडे वेगळे करून रोपवाटिकेतील पाण्याच्या टाकीत सोडावेत. पावसाळ्याच्या सुरवातीस किंवा इतर वेळेस शेततळे किंवा तलावात पाणी उपलब्ध असल्यास लागवड करावी. लागवडीसाठी तलावात गुडघाभर पाणी पुरेसे होते. रोपांची या गुडघाभर पाण्यात १ बाय २ मीटर किंवा २ बाय ३ मीटर अंतरावर लागवड करावी. पूर्ण वाढ झालेल्या वेलांचाही बियाणे म्हणून वापर करता येतो.

हवामान : बीज उगवणीसाठी पाण्याचे तापमान १२-१५ अंश सेल्सिअसपर्यंत असावे. पीक फुलोऱ्यात येण्यासाठी २० अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची गरज असते. उन्हाळ्यातील उच्च तापमान तसेच हिवाळ्यातील कमी तापमानातही उत्पादनात चांगली वाढ मिळविता येते.



माती : शिंगाडा ही एक पाण्यात वाढणारी वनस्पती आहे. तिच्या वाढीसाठी मातीचे एवढे महत्त्व नसते, मात्र चांगली भुसभुशीत केलेली सुपीक, अन्नद्रव्य असलेली जमीन उत्पन्नवाढीसाठी निश्चित उपयुक्त ठरते.

अन्नद्रव्य व्यवस्थापन : शिंगाडा वाढीसाठी नत्र या अन्नघटकाचीच अधिक गरज असते. रासायनिक खते देताना त्यात काही प्रमाणात कोंबडी खत दिल्यास उत्पादनात वाढ होण्यास मदत मिळते. शक्यतो लागवडीच्यावेळी युरिया ३० ते ४० किलो अधिक ४ ते ५ किलो कोंबडी खत प्रति एकर या प्रमाणात मिश्रण करून खत द्यावे. लागवडीनंतर २० दिवसांनी पुन्हा प्रतिएकरी ३० ते ४० किलो युरिया द्यावे.

पाणी व्यवस्थापन : लागवडीनंतर वाढीच्या काळात तळे नेहमी पाण्याने भरलेले असावे. मातीच्या वर २० ते ४० सें.मी.पर्यंत पाण्याचा थर असावा. पाण्याचे प्रमाण यापेक्षाही जास्त असेल तरी शिंगाड्याची वाढ व्यवस्थित होते. परंतु फळांच्या काढणीच्या वेळी पाण्याचा निचरा करणे आवश्यक असते, कारण कमी पाण्यात काढणी सोपी होते. उन्हाळ्यात तलावातील पाणीपातळी घटणार नाही याची काळजी घ्यावी.

आंतरमशागत : आंतरमशागतीमध्ये तलावातील तणांचे निर्मूलन आवश्यक ठरते. त्यामध्ये हायड्रिला आणि जलकुंभी ही तणे काढणे अत्यंत आवश्यक आहे.

फळांची वाढ : फळे लागण्यास सुरवात उन्हाळ्यात होते. झाडांच्या खालील बाजूस मुळांच्या वर असलेल्या भागातील फुलांना फळे लागण्यास सुरवात होते. पाण्याचा रंग हिरवापासून जांभळा-तपकिरी रंगाकडे बदलत जातो, तसतसे फळे फुगण्यास सुरवात होते. फळे त्यांच्या काट्याच्या साह्याने गाळाशी अडकतात.

काढणी : शिंगाडा हे चार महिन्यांत उत्पादन देणारे पीक आहे. फेब्रुवारी महिन्यात लागवड केल्यास त्याची काढणी जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून सुरू करता येते. कारण उन्हाळ्यातील अधिक तापमान या पिकाला मानवून फळे साडेतीन महिन्यांतच काढणीसाठी तयार होतात. पावसाळ्यात जून महिन्यात लागवड केल्यास फळांची काढणी सप्टेंबर महिन्यात सुरू होते. काढणीसाठी शेतकरी तराफ्याचा वापर करतात. हाताच्या साह्यानेसुद्धा काढणी करता येते. शिंगाड्याचे सरासरी प्रतिहेक्टरी उत्पादन २००-३०० क्विंटल एवढे मिळते.

रोपांचे स्थलांतर करताना घ्यावयाची काळजी : रोपवाटिकेमध्ये तयार झालेल्या रोपांच्या वेलांची उंची ३० सें.मी. झाल्यावर (साधारण महिना- दीड महिना) या रोपांचे स्थलांतर करावे. जर उंची जास्त झालेली असेल, तर वेलीला फुटलेले इतर अंकुर काढून टाकावेत. स्थलांतर करताना रोपांमध्ये ओलावा असणे गरजेचे आहे. लावताना रोपे पूर्ण पाण्याखाली राहणार नाहीत याची काळजी घ्यावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२१ : फर्डिनांड मॅगेलन जगप्रदक्षिणा करीत फिलिपाईन्सला पोहोचला.
१५२७ : मुघल सम्राट बाबर यांनी खानवा येथील युद्धात राणा सांगा यांचा पराभव केला होता.
१५२८ : फत्तेपूर-शिक्री येथे राणा संग व बाबर यांचे घनघोर युद्ध होऊन राणा संग याचा पराभव झाला. चैत्र शु. १४
१६४९ : शहाजीराजांच्या सुटकेसाठी शिवाजी महाराजांनी शहजादा मुराद (शहाजहानचा मुलगा) यास पत्र लिहीले.
१८४६ : प्रथम इंग्रज- सिख युद्धाच्या माध्यमातून अमृतसर ची संधी झाली होती.
१९११ : भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक उदारमतवादी राजकीय नेते व समाज सुधारक गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारतात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा ठराव मांडला.
१९१९ : भारतात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा ठराव गोपाळकृष्ण गोखले यांनी मांडला.
१९३७ : महाड येथील चवदार तळ्याचे पाणी दलितांना देण्याचा अधिकार मुंबई येथील उच्च न्यायालयाने दिला.
१९४३ : 'प्रभात'चा 'नई कहानी' हा चित्रपट रिलीज झाला.
१९४५ : दुसरे महायुद्ध रॉयल एअर फोर्सने तुफानी बॉम्बफेक करून जर्मनीच्या वुर्झबर्ग शहराचा २० मिनीटांत विनाश केला.
१९५५ : राष्ट्रीय लसीकरण दिवस
१९३६ : महाड येथील चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा दलितांना हक्क असण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला.
१९६६ : अमल कुमार सरकार यांनी भारताचे ८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९७६ : इंग्लंडचे पंतप्रधान हेरॉल्ड विल्सन यांनी राजीनामा दिला.
१९९२ : सत्यजित रे यांना ऑस्कर पारितोषिक प्रदान करण्यात आले.
२००० : हॉकीपटू धनराज पिल्ले आणि मध्य अंतराची धावपटू ज्योतिर्मय सिकदर यांना 'के. के. बिर्ला पुरस्कार' जाहीर
२००१ : नेल्सन मंडेला यांना राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते 'गांधी शांतता पुरस्कार' प्रदान
२०१२ : अंतरराष्ट्रीय क्रिकेट मध्ये १०० शतक बनवणारे क्रिकेट विश्वातील पहिले क्रिकेट पटू म्हणजेच भारतीय मास्तर ब्लास्टर सचिन तेंडूलकर हे होत.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६९३ : मल्हारराव होळकर इंदूरच्या राज्याचे संस्थापक, मराठेशाहीतील पराक्रमी सेनापती व मुत्सद्दी (मृत्यू: २० मे १७६६)
१७५० : कॅरोलिन हर्षेल जर्मन-ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ, ही प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ विल्यम हर्षेलची बहिण असुन तिने ८ धुमकेतू व ३ तारकासमुह शोधले आहेत. (मृत्यू: ९ जानेवारी १८४८)
१७५१ : जेम्स मॅडिसन अमेरिकेचे चौथे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २८ जून १८३६)
१७८९ : जॉर्ज ओहम जर्मन गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ६ जुलै १८५४)
१९०१ : प्र. बा. गजेंद्रगडकर भारताचे ७ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १२ जून १९८१)
१९०१ : भारतीय क्रांतिकारक आणि महात्मा गांधी यांचे अनुयायी पोट्टी श्रीरामुलु यांचा जन्मदिवस.
१९१० : वे८ पतौडी नवाब इफ्तिखार अली खान पतौडी यांचा जन्म. (मृत्यू: ५ जानेवारी १९५२)
१९२१ : फहाद सौदी अरेबियाचा राजा (मृत्यू: १ ऑगस्ट २००८)
१९३६ : भास्कर चंदावरकर संगीतकार (मृत्यू: २६ जुलै २००९)
१९३६ : चित्रकार आणि कोरा कॅनव्हास चे लेखक प्रभाकर बर्वे यांचा जन्म.
१९३६ : एम.आर.आय. चे शोधक रेमंड वहान दमडीअन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९९० : वि. स. पागे स्वातंत्र्यसैनिक, गांधीवादी कार्यकर्ते, संत वाङ्मयाचे अभ्यासक, महाराष्ट्र विधानसभेचे सभापती, रोजगार हमी योजनेचे जनक (जन्म: २१ जुलै १९१०)
१९४५ : गणेश दामोदर तथा 'बाबाराव' सावरकर कट्टर हिंदुत्त्ववादी आणि 'अभिनव भारत' संघटनेचे संस्थापक (जन्म: १३ जून १८७९)
१९४६ : 'गान सम्राट' उस्ताद अल्लादियाँ खाँ जयपूर -अत्रौली घराण्याचे संस्थापक व कोल्हापूर दरबारचे प्रसिद्ध गायक (जन्म: १० ऑगस्ट १८५५)
१९४७ : हिंदी साहित्य लेखक अयोध्या सिंह उपाध्याय 'हरि औंध' यांचे निधन.
१९९९ : कुमुदिनी रांगणेकर इंग्रजी लेखकांची मराठी वाचकांना ओळख करुन देणार्या लेखिका (जन्म: )
१९९९ : कुमुदिनी पेडणेकर गायिका
२००७ : मंजुरूल इस्लाम बांगला देशचा क्रिकेटपटू (जन्म: ४ मे १९८४)

# आकर्षक रंगाची 'बसरा कोंबडी' व्यावसायीक फायद्याची !

परसबागेत पाळल्या जाणाऱ्या कोंबड्यांच्या जातीमध्ये महत्वाची एक जात म्हणजे बसरा कोंबडी. मांस उत्पादनासाठी पाळल्या जाणाऱ्या या बसरा कोंबडीचे मांस अतिशय रुचकर असते. जर तुम्ही कोंबडी पालन करायचा विचार करत असाल तर जाणून घ्या या जातीबद्दल अधिकची माहिती.

उगम : ही जात महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमेवर प्रामुख्याने आढळते. सामान्यतः नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुका आणि महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यांतील साक्री तालुक्यात दिसून येतात तसेच गुजरातच्या सुरत जिल्ह्यातील जुनागढ आणि उच्छल तालुक्यातही आढळतात.

शरीर रचना : या कोंबडीची जात शरीराने लहान असून लाल, काळ्या आणि लालसर तपकिरी अशा अनेक रंगांमध्ये आढळते. पिसे पांढर्या रंगांची असतात. मान आणि शेपटीवरील पिसांचा रंग काळा असतो. खांदा, पंखांवर लाल-तपकिरी पिसे असतात. नराचे वजन २.५-३ किलो आणि मादीचे सरासरी वजन २-२.५ किलो असते.

प्रजनन आणि उत्पादन माहिती : या जातीच्या कोंबड्यांना लैंगिक परिपक्वता १५० ते २१० दिवसांच्या दरम्यान येते. या कोंबड्या प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी पाळल्या जात असल्यामुळे अंडी देण्याचे प्रमाण कमी असते. वर्षभरात फक्त ४० ते ५५ अंडी देतात. या कोंबड्यांचा अंडी उबवणुकीचा दर ६० ते ८५ टक्के असतो.

विशेष माहिती : भक्षकांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी या कोंबड्या सरड्याप्रमाणे त्यांच्या शरीराचा रंग बदलतात असे काहीजण म्हणतात पण ते कितपत खरे आहे ते अजून माहित नाही. ही कोंबडी आजाराला लवकर बळी पडते. या कोंबड्या जरी आकाराने लहान असल्या तरी त्यांना निरोगी राहण्यासाठी पौष्टिक आहाराची आवश्यकता असते. या कोंबड्या मुक्तपणे राहणे पसंत करतात, त्यामुळे जंगली धान्य आणि कीटक हे त्यांचे प्राथमिक अन्न आहे. जर तुम्हाला तुमच्या आहारात प्रथिने आणि महत्वाची पोषक तत्वे समाविष्ट करायची असल्यास बसरा चिकन हा एक चांगला आणि स्वादिष्ट पर्याय आहे. परंतु या कोंबड्या काही ठराविक भागातच फार कमी प्रमाणात आढळतात.



सोमवार दि.१६ मार्च २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# घरात झोपलेल्या महिलेला उचलून नेत अत्याचार

## नंतर नराधमाने पीडितेला गावच्या चावडीवर बांधलं

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यातील एका गावात विवाहितेवर अत्याचार करण्यात आल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. ही विवाहिता घरात झोपली होती. पण आरोपीने तिला घरातून उचलून गावाबाहेर नेलं. तिथे तिच्यावर अत्याचार केला. आरोपीचा क्रूरपणा एवढ्यावरच थांबला नाही तर आरोपीने पीडित महिलेला गावच्या चावडीवरील खांब्याला बांधून ठेवलं. या घटनेचा व्हिडाओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

या घटनेप्रकरणी पोलिसांनी आरोपी वैभव पटेकर याला बेड्या ठोकल्या आहेत. आरोपीला कोर्टाने १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. बीडच्या पिंपळनेर पोलीस ठाण्यात या संपूर्ण घटनेप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपीला तातडीने अटक करण्यात आली आहे. पोलिसांकडून पीडित महिलेची विचारपूस केली जात आहे. तसेच या प्रकरणात सखोल तपास केला जात आहे.संबंधित घटना ही बीड जिल्ह्यात पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीतील एका गावात घडली आहे. गरम होत असल्याने



रात्रीच्या वेळी महिलेने घराचा दरवाजा उघडा ठेवला होता. याच गोष्टीचा फायदा घेत आरोपी हा पीडित महिलेच्या घरात शिरला. घरात सर्वजण झोपले होते. आरोपीने घरात झोपलेल्या विवाहितेला उचलून नेत गावाबाहेर नेले. आरोपीने हे कृत्य करत असताना पीडितेने ओरडण्याचा प्रयत्न केला. पण आरोपीने तिचं तोंड हाताने घट्ट दाबलं. यानंतर आरोपी गावाबाहेर नदीत पीडितेला घेऊन गेला. तिथे त्याने पीडितेवर अत्याचार केला.पीडितेने आरोपीला प्रतिकार करण्याचा प्रचंड प्रयत्न केला. पण तिची शक्ती आरोपीसमोर कमी पडली. या घटनेत पीडिता बेशुद्ध झाली. या घटनेनंतर आरोपीने क्रूरपणाच्या सर्व सीमा पार केल्या. त्याने बेशुद्ध झालेल्या पीडितेला गावाच्या चावडीवर नेलं. तिथे त्याने खांब्याला पीडितेला बांधलं आणि तिथून पसार झाला. पहाटे गावाचे नागरीक चावडीवर आले तेव्हा त्यांनी पीडितेची विचारपूस केली. त्यानंतर सर्व प्रकार उघडकीस आला. या घटनेचा व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तसेच या घटनेमुळे गावासह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली.घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तातडीने आरोपीचा शोध घेत त्याला अटक केली. त्यानंतर त्याला कोर्टात हजर केलं. घटनेचं गांभीर्य ओळखून कोर्टाने आरोपीला १७ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. तसेच या घटनेप्रकरणी पिंपळनेर पोलीस आणि 'पिंक' पथकाकडून सखोल तपास केला जात आहे..

## राष्ट्रीय लोक आदालतमध्ये १७ प्रकरणात २ कोटी ५७ लाखाची वसुल

### काही प्रकरणात पती-पत्नीचे संसार जुळले



अंबड। प्रतिनिधी

तालुका विधी सेवा समिती, अंबड व वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १४ मार्च २०२६ रोजी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, अंबड येथे राष्ट्रीय लोकअदालत मध्ये न्यायालयातील व दाखलपूर्व एकूण १६. प्रकरणे निकाली काढण्यात आले. तसेच काही पती-पत्नीच्या वादात सुरू असलेले प्रकरण मध्ये काहींचा या लोक अदालत मध्ये पती-पत्नीचे संसार जुळले . या लोकअदालतसाठी एकूण ०५ पॅनल ठेवण्यात आले होते. पॅनल क्र. ०१ श्री.एस.बी. गायधनी जिल्हा न्यायाधीश-०१ यांनी पॅनल प्रमुख म्हणून काम पाहिले तसेच अनुक्रमे. पॅनल क. ०२. श्री.एम.जे.जे.बेग जिल्हा न्यायाधीश-०२ पॅनल क्र. ०३. श्रीमती. एस.एस. जैन, दिवाणी न्यायाधीश क. स्तर अंबड, पॅनल क. ०४. श्रीमती एस.एच. राठी, २रे सह दिवाणी न्यायाधीश क्र. स्तर अंबड, पॅनल क्र. ०५ श्रीमती एस.एस. परिहार ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर अंबड, यांनी पॅनल प्रमुख म्हणून कामे पाहिले तसेच वकीलसंघ अंबड येथील विधीज्ञ ॲड. श्री. डि.के. कु-हाडे, ॲड. बी. एफ. सिध्दीकी, ॲड. श्री.डि. व्ही. काळे, ॲड. श्रीमती. व्ही. के. अवचार, ॲड. श्रीमती. एस.एम. पुरी यांनी विविध पॅनल वरती पंच म्हणून कामे पाहिली या लोक अदालत साठी वकिल संघ अंबड येथील विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी, विविध बँकाचे अधिकारी व कर्मचारी, पोलिस स्टेशन अंबड व गोंदी येथील पोलिस, पक्षकार, महिला, जेष्ठ नागरीक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती व या सर्वांच्या सहकार्यामुळे लोकअदालत यशस्वी रित्या संपन्न झाली.

## अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवा

### आ. अमित गोरखे यांनी विधानपरिषदेत सरकारचे लक्ष वेधले

मुंबई। प्रतिनिधी

लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता ६ वीची विद्यार्थिनी कु. अनुष्का पाटोळे हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले आहे. या प्रकरणातील गुढ आणि स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, या प्रकरणाचा तपास तातडीने सीबीआयकडे सोपवण्यात यावा, अशी आक्रमक मागणी भारतीय जनता पक्षाचे आमदार अमित गोरखे यांनी विधानपरिषदेत सरकारचे लक्ष वेधले. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना आ. गोरखे यांनी हा मुद्दा अत्यंत प्रभावीपणे मांडला. त्यांनी यावेळी प्रशासकीय निष्काळजीपणा आणि पोलीस तपासातील त्रुटींवर बोट ठेवले.




एका निवासी शाळेत, जिथे मुलांच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य आणि कर्मचारी वर्गाची असते, तिथे एका निष्पाप मुलीचा मृत्यू होणे हे केवळ अपयश नसून क्रूरता आहे. अनुष्का ही अनुसूचित जाती समाजातील असून, तिच्या मृत्यूला अनेक दिवस उलटूनही स्थानिक पोलिसांनी केवळ 'अपघाती मृत्यू' अशी नोंद केली आहे. घटनेला इतके दिवस होऊनही शाळा प्रशासनावर किंवा जबाबदार कर्मचाऱ्यांवर कोणतीही ठोस कायदेशीर कारवाई झालेली नाही. हा 'तपासाचा अभाव' गुन्हेगारांना वाचवण्यासाठीचा पद्धतशीर प्रयत्न वाटत असल्याचे त्यांनी नमूद केले. या घटनेमुळे राज्यातील लाखो पालकांच्या मनात आपल्या मुलांच्या सुरक्षिततेबद्दल भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सभागृहात बोलताना आमदार अमित गोरखे म्हणाले की, स्थानिक पोलिसांच्या संशयास्पद कार्यपद्धतीमुळे पीडित कुटुंबाचा तपासावरील विश्वास उडाला आहे. अनुष्काला न्याय मिळवून देण्यासाठी आणि यामागील सत्य बाहेर येण्यासाठी राज्य सरकारने हे प्रकरण तातडीने सीबीआयकडे वर्ग करावे.या संवेदनशील प्रकरणात सरकारने तातडीने हस्तक्षेप करून दूध का दूध आणि पाणी का पाणी करावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे. आता यावर सरकार काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## कर्जमाफीचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी केवायसी अपडेट-जिल्हाधिकारी मित्तल

जालना। प्रतिनिधी

शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ घेण्यासाठी जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आपल्या बँक शाखेत तातडीने केवायसी कागदपत्रे अद्ययावत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळवण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे संबंधित बँक शाखेत सादर करावीत. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने शेतकऱ्यांना आधार कार्ड आणि इतर महत्त्वाची केवायसी कागदपत्रे तात्काळ अद्ययावत करण्यासाठी



बँक शाखेत संपर्क साधावा लागेल असे आवाहन केलेले आहे. शेतकऱ्यांनी कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर, त्यांना शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेचा लाभ मिळवता येईल.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळवण्यासाठी योग्य प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले असून, शेतकऱ्यांना बँक शाखेत जावून केवायसी फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे.जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी कर्जमाफीचा लाभ मिळवण्यासाठी केवायसी अपडेट करण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण करावी असे जिल्हा बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी कळविले आहे.



**जालना : डॉ रामेश्वर शिंदे यूपीएससमध्ये यश संपादन डॉ. रामेश्वर महादेवराव शिंदे यांनी UPSC Civil Services Examination मध्ये देशात ७०५ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. याबद्दल त्यांचा भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी विजय भुतडा, जगदीश भुतडा, गणेश बियाणी, बद्रीनारायणजी बियाणी, सत्यनारायणजी मानधानी, दीपक चरखा, आनंद बियाणी, नामदेव गाडे, अर्जुन कोठकर, डॉ. गणेश शिंदे, डॉ. नारायण शिंदे आदी उपस्थित होते.**

## कुट्टी मशीनचा भोंगा तुटून शेतकऱ्याचा मृत्यू

संभाजीनगर। प्रतिनिधी

कन्नड तालुक्यातील शिरसगाव येथे चारा कुट्टी करणाऱ्या मशीनचा भोंगा (ब्लो-अर) अचानक तुटून अंगावर पडल्याने ५५ वर्षीय शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. सुखराम लक्ष्मण मोरे (वय ५५) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुखराम मोरे हे शनिवारी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या गट क्रमांक १३२ असलेल्या शेतात चारा कुट्टी करण्याचे काम करत होते. काम सुरू असताना अचानक कुट्टी मशीनचा भोंगा तुटून थेट त्यांच्या अंगावर आदळला. या भीषण अपघातात ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर नातेवाईकांनी त्यांना तातडीने कन्नड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. कन्नड ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. अनिरुद्ध गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ. उल्फत परदेशी यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. सुखराम मोरे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. या प्रकरणी गोपीचंद हरचंद मोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार संदीप कनकुटे करत आहेत.

गह सोंगणीसह विविध कामांसाठी शेतकरी आत्याधिक औजारे, मशिनचा वापर करून शेतीचे कामे करतात. थोड्या चुकीमुळे शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागतो. घरातील करता पुरूष गेल्याने त्या कुटुंबावर आधार जातो. शिरसाग येथील घटना दुर्दैवी असून शेतात काम करताना शेतकऱ्यांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## सहा जिल्ह्यात सोलर वायर चोरणारी टोळी जेरबंद

संभाजीनगर / प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून पाचोडसह सहा जिल्ह्यांत सोलर पंपच्या वायरची चोरी करून धुमाकूळ माजवणाऱ्या महाराष्ट्रातील ६ जिल्ह्यांमध्ये सोलर ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य करून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या एका अट्टल आणि खतरनाक टोळीचा छत्रपती संभाजीनगर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने थरारक पाठलाग करून पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी मुख्य सूत्रधारासह चार जणांना बेड्या ठोकल्या असून, १७ लाख ८ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

टोळीने पाचोड येथील सब स्टेशनवर धाड टाकली होती. या चोरीत चोरट्यांनी १ लाख १० हजारांची वायर लंपास करून हे चोरटे अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले होते. सोलर टेक्निशियन भाऊसाहेब लहू पवार यांच्या तक्रारीवरून पाचोड पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुध्द विविध कलमांखाली गुन्हा दाखल झाला होता. तपासादरम्यान पोलिस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांच्यासह पोलिसांनी शुक्रवार खामकरवाडी येथे १३ मे रोजी सापळा रचून आरोपी पवन काळेला शिताफीने ताब्यात घेतले. पवन काळेची चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि त्याचे जाळे किती विस्तारलेले आहे याचा खुलासा झाला.

त्याच्या माहितीवरून पोलिसांनीसुनील बापू तपकिरे (रा. भोसा साथीदार), तवाब नवाब खान (माल विकत घेणारा दुकानदार), ईश्वर पांडुरंग गवळी (गाडीचा मालक) खालील आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्यांच्या ताब्यातून विना क्रमांकाची काळी स्कॉर्पिओ, मोबाईल फोन, चोरीची तांब्याची वायर आणि रोख रक्कम असा एकूण १७ लाख ८ हजार २४० रुपयांचा माल जप्त केला आहे. अटक करण्यात आलेली टोळी केवळ छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातच नव्हे, तर जालना, बीड, धाराशिव, अहिल्यानगर आणि सोलापूर या जिल्ह्यांत सक्रिय असल्याचे तपासात उघड झाले आहे. मुख्य आरोपी पवन ऊर्फ छन्नू काळे हा धाराशिव जिल्ह्यातील वाशी व मुरूम पोलिस ठाण्यातील दरोड्याच्या गुन्ह्यांत फरार होता. तसेच धुळेडूसोलापूर महामार्गावर रात्रीच्या वेळी रस्त्यावर टायर फेकून वाहनचालकांना लुटण्याच्या प्रकारातही त्याचा सहभाग असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे.

# पाथर्डी पंचायत समितीच्या भ्रष्ट कारभाराला जि.प. सीईओ आनंद भंडारी यांचा दणका !

## पंचायत समिती कर्मचाऱ्यांची काढली झाडाझडती !

पाथर्डी । प्रतिनिधी

पंचायत समितीचा कारभार सर्वसामान्य नागरिक व कर्मचाऱ्यांनाही मनस्ताप देणारा ठरत असून वारंवार होणाऱ्या तक्रारी आणि विविध आंदोलने ही आता नित्याचीच बाब झाली आहे या समस्येला वैतागून जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी गुरुवारी सकाळी अचानक भेट दिली आणि पंचायत समितीच्या बहुसंख्य कर्मचाऱ्यांची चांगलीच कानउघडणी केली काहींना कडक शब्दांत सुनावले तर काहींवर कारवाईचा बडगा उभारण्याबाबत गटविकास अधिकाऱ्यांना थेट आदेश दिले पंचायत समितीच्या गलथान कारभाराची चर्चा गेल्या दोन वर्षांपासून सुरू असून वैयक्तिक लाभाच्या योजनांबाबत लोकप्रतिनिधींसह लाभार्थ्यांनी केलेल्या आरोपांची कुठेही दखल घेतली गेली नव्हती यामुळे येथे एखादी सूत्रबद्ध साखळी कार्यरत आहे का अशी शंका सर्वसामान्य लाभार्थ्यांना येऊ लागली होती

पाथर्डी तालुका आढावा बैठकीतही आ.मोनिका राजळे यांनी पंचायत समितीच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमवेत स्वतंत्र बैठक लावण्याच्या सूचना केल्या होत्या पाथर्डी तालुक्यातील पंचायत समितीच्या चुकीच्या कामकाजामुळे जिल्हा परिषद प्रशासनाची प्रतिमा डागाळत असल्याने कुठलीही पूर्वसूचना न देता मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी आपला मोर्चा पाथर्डी पंचायत समिती कार्यालयाकडे वळविला त्यांच्या अचानक येण्याने कार्यालयात एकच धावपळ उडाली पाहणी दरम्यान अस्ताव्यस्त फाईल्स सर्वत्र धुळीचे साम्राज्य वेळेचे उल्लंघन आणि नागरिकांशी असभ्य वर्तन अशा बाबी समोर आल्या घरकुल गायगोठा रोजगार हमी आणि वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटींवरून त्यांनी विस्तार अधिकाऱ्यांची कडक कानउघडणी केली तसेच महत्त्वाच्या वेळी फोन बंद ठेवणाऱ्या ग्रामसेवकांची यादी तयार करून त्यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश दिले.छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या स्वच्छतेवरून त्यांनी जबाबदार कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाईचे आदेश दिले आहेत.

संपूर्ण पंचायत समिती कार्यालयाची पाहणी केल्यानंतर विभाग प्रमुखांची बैठक घेत त्यांनी कामकाजाबाबत असमाधान व्यक्त केले कर्मचाऱ्यांनी वेळेवर यावे प्रामाणिक काम करावे आणि लाभार्थ्यांना सौजन्याने माहिती द्यावी एवढीच माफक अपेक्षा आहे आता कर्तव्यात कसूर करणाऱ्यांची हयगय केली जाणार नाही अशा शब्दांत त्यांनी सुनावले शिपाई वेळेवर येत नसतील तर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करा अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या माध्यमांमधून वारंवार होणाऱ्या टीकेची दखल घेत सत्यता पडताळण्यासाठी स्वतः धाड टाकून जाहीर कबुली देणारे आनंद भंडारी हे एकमेव अधिकारी ठरले आहेत त्यांच्या या दौऱ्यामुळे पाथर्डीतील इतर प्रशासकीय कार्यालयांचेही धाबे दणाणले असून आता सर्वत्र अशीच शिस्त लागण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## उसाच्या शेताला पहाटे लागलेल्या आगीत वारकऱ्याचा कोळसा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील ममदापूर शिवारात आज पहाटे एक मोठी घटना उघडकीस आली आहे. शेतातील ऊसाला लागलेल्या आगीत एका ६० वर्षीय वृद्धाचा जळालेल्या अवस्थेत बॉडी आढळून आला. विश्वनाथ पांचाळ (वय ६०) असं मृत व्यक्तीचं नाव असून, त्यांनी आजाराला कंटाळून स्वतःला जाळून घेत आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. मात्र, मृत्यूचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील ममदापूर येथील शेतकरी दिलीप मोतीराम देशमुख यांच्या गावालगत असलेल्या दोन एकर ऊसाला अचानक आग लागली. आज पहाटे साडेपाचच्या सुमारास त्यांच्या सालगड्याने ही माहिती दिली. जेव्हा आग विझवण्याचे प्रयत्न सुरू झाले, तेव्हा ऊसाच्या सरीमध्ये एका व्यक्तीचा बॉडी पूर्णतः जळालेल्या अवस्थेत दिसून आली. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला असल्याचे पोलिसांच्यावतीने सांगण्यात आलं आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
सोमवार दि.१६ मार्च २०२६ | ६

# मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना यशस्वीपणे राबविणाऱ्यांचा जाहीर सत्कार करणार -आ. धनंजय मुंडे

**जास्तीत जास्त कामे प्रस्तावित करा, अतिक्रमणे आणि अपिलांची प्रकरणे सोडवण्यासाठी मिळून प्रयत्न करा, परळी मतदारसंघातील शेत-पाणंद रस्ते योजनेचा धनंजय मुंडे यांनी घेतला आढावा**

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना उत्पादित शेतीमालाला ताजी बाजारपेठ मिळवून देण्यासह स्थानिक दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. या योजनेतून परळी मतदारसंघातील प्रत्येक शेत / पाणंद पक्क्या रस्त्याने जोडण्याचे आपले उद्दीष्ट असून, यासाठी मनरेगासह जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून जास्तीत जास्त कामे प्रस्तावित केली जावीत. या निधी बरोबरच विविध कंपन्यांच्या सीएसआर फंडातून देखील निधी उपलब्ध करून देण्यासाठी मी प्रयत्नशील







असून, ही योजना १००% यशस्वीपणे राबवणाऱ्या ग्रामपंचायती तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांचा आपण जाहीर सत्कार करणार असल्याची भावना माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी येथील एका बैठकीत बोलून दाखवली.

परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेतून प्रस्तावित कामांचा धनंजय मुंडे यांनी आज संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रमुख पदाधिकारी व विविध गावच्या सरपंच, उपसरपंच आदींच्या उपस्थितीत सविस्तर आढावा घेऊन व्यापक चर्चा केली. शेत / पाणंद रस्त्यांच्या प्रस्तावित कामांमध्ये ज्या ठिकाणी अतिक्रमणे किंवा अपिल आहेत अशी प्रकरणे तातडीने सोडवावीत यासाठी एक विशेष कृती कार्यक्रम तयार करावा, तसेच अडचणीची अपिले किंवा अतिक्रमणे निकाली काढण्यासाठी आवश्यक तिथे आपणही स्थानिक ग्रामस्थांच्या मध्यस्थीने मदत करू, असेही धनंजय मुंडे या बैठकीत म्हणाले.

प्रत्येक गावातील कामे प्रस्तावित करताना संबंधित गावचे सरपंच तसेच प्रतिनिधींच्या सूचना विचारात घ्याव्यात अशा सूचनाही धनंजय मुंडे यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर आबा चव्हाण, जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे, बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, शिवाजीराव शिरसाट, राजाभाऊ पोळ, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, प्र. तहसीलदार विलास तरंगे, गटविकास अधिकारी राजवर्धन भोसले यांसह विविध गावचे सरपंच, पदाधिकारी तसेच संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

## सुरत चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग भूसंपादन प्रकरणी शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला देण्यासाठी प्रयत्न करणार -आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

सुरत ते चेन्नई हा राष्ट्रीय ग्रीन फिल्ड महामार्ग आष्टी तालुक्यातील १९ गावांमधून जात असून या महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या बहुमोल किमतीच्या जमिनी भूसंपादित करण्यात येणार असल्याने या संपादित जमिनींवरील फळबागा, वृक्ष लागवड, घरांचे बांधकाम, पत्रांचे शेड्स, विहिरी खोदकाम या सर्व संपत्तीचे मूल्यमापन योग्य पद्धतीने करून शेतकऱ्यांना महामार्ग प्राधिकरणाने जमिनीचा योग्य मोबदला देण्यात



यावा यासाठी आपण जिल्हाधिकारी बीड यांच्याशी आणि आवश्यकता वाटल्यास वरिष्ठ अधिकारी यांच्याशी चर्चा करणार आहोत अशी माहिती आमदार सुरेश धस यांनी याबाबतच्या प्रशासन आणि संबंधित शेतकरी त्यांचे संयुक्त बैठकीमध्ये बोलताना दिली

आज या महत्वपूर्ण विषयाच्या बैठकीसाठी पाटोदा विभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख आणि राष्ट्रीय महामार्ग जीवन प्राधिकरण विभागाचे अधिकारी आणि नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर नायब तहसीलदार आणि १९ गावातील संबंधित शेतकरी हे उपस्थित होते

आष्टी तालुक्यातील नांदूर ते पारगाव जोगेश्वरी या दरम्यानच्या १९ गावांमधून हा राष्ट्रीय ग्रीनफिल्ड महामार्ग जात असून सुमारे ३८ किलोमीटर अंतराचा असून त्यासाठी २०० ते २२५ हेक्टर्स जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार आहे या ◀◀ पान ३ वर

## माजी आ. भीमराव धोंडे यांच्या निवासस्थानी 'दावत-ए-इफ्तार'





आष्टी । प्रतिनिधी

पवित्र रमजान महिन्याच्या औचित्य साधून आष्टी येथे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेला 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रम शनिवार दि. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी उत्साहात व मोठ्या धार्मिक आणि सामाजिक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमातून सर्वधर्मसमभाव, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संदेश देण्यात आला.

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आष्टी येथील निवासस्थानी हा इफ्तार सोहळा आयोजित करण्यात आला होता. 'माजी आ. भीमराव धोंडे मित्र मंडळ, आष्टी-पाटोदा-शिरूर' यांच्या वतीने कार्यक्रमाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती.

रमजान ◀◀ पान ३ वर

## गर्दीचा फायदा घेत चोरट्याने महिला तलाठ्याचे सोन्याचे गंठण पळवले

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील टाकळी फाटा येथे आयोजित संगीत रामकथा ऐकण्यासाठी गेलेल्या एका महिला तलाठ्याच्या गळ्यातील २ लाख ३७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण अज्ञात चोरट्याने लंपास केले आहे. गर्दीचा फायदा घेत गुरुवारी दुपारी ही चोरी करण्यात आली असून, याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात शुक्रवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


टाकळी फाटा येथे हभप रामायणाचार्य रामराव महाराज ढोक (नागपूरकर) यांची संगीत रामकथा आयोजित करण्यात आली आहे. या कथेसाठी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) आशा विजयसिंह काकडे (रा. साबला) या आपल्या कुटुंबासह गेल्या होत्या. दुपारी २:३० ते ५:३० या वेळेत कथा ऐकत असताना, चोरट्याने त्यांच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे मिनी गंठण अत्यंत शिताफीने चोरून नेले. कथा संपल्यानंतर ही बाब त्यांच्या लक्षात आली.

आशा काकडे यांच्या फिर्यादीवरून केज पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक उपनिरीक्षक प्रल्हाद चव्हाण या प्रकरणाचा तपास करत आहेत. मोठ्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये चोरांचे रॅकेट सक्रिय असण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून, महिला भाविकांनी आपल्या दागिन्यांची काळजी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## गॅस-इंधन टंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवू नका -विनायक रत्नपारखी

माजलगाव । प्रतिनिधी

आखाती भागातील युद्धपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर गॅस, पेट्रोल व डिझेल टंचाईबाबत विविध अफवा पसरवल्या जात असल्याचे दिसून येत आहे. मात्र अशा अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहन भाजपाचे माजलगाव शहर मंडळ तालुकाध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.



दरम्यान जिल्हा प्रशासनाकडूनही अधिकृत पत्रक प्रसिद्ध करण्यात आले असून इशशव जिल्ह्यात कोठेही गॅस, पेट्रोल किंवा डिझेलची टंचाई नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. घरगुती गॅस तसेच पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. सोशल मीडियावरील काही पोस्टमुळे नागरिकांमध्ये ◀◀ पान ३ वर

## होळ येथील आरोग्य तपासणी शिबिरास मोठा प्रतिसाद, ४०० ते ४५० रुग्णांची तपासणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मौजे होळ ता केज जिल्हा बीड येथील आरोग्य शिबिरात दंत तपासणी व नेत्र तपासणी झाली. या शिबिरात ४०० ते ४५० नागरिकांची तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान ६० रुग्णांमध्ये मोतीबिंदू आढळून आला असून त्यांची ईसीजी तसेच आवश्यक ती रक्त तपासणी करण्यात आली. या सर्व रुग्णांच्या दोन टप्प्यांमध्ये केज येथील उपजिल्हा रुग्णालयात मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया करण्यात



येणार आहेत.

या आरोग्य शिबिरासाठी डॉ. स्नेहल सागर (नेत्ररोग तज्ञ)। डॉ. नितीन चव्हाण (नेत्ररोग तज्ञ)डॉ.प्रशांत शिंदे (दंतरोग तज्ञ),इरफान पठाण (ई सी जी टेक्निशियन),वैभव आडसकर (एन पी डब्ल्यु), (पान २ वर)

## मुद्रा मोदी से मुजराच्या घोषणांनी नेकनूर दणाणले मोदी हटाव,देश बचाव म्हणत वंचित बहुजन आघाडीचा रस्ता रोको

बीड । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नेकनूर येथे मोदी हटाव, देश बचाव या घोषवाक्याखाली भव्य रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात तसेच विविध राष्ट्रीय व सामाजिक प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन छेडण्यात आले.

आंदोलनाची सुरुवात भारतीय संविधानाचे शिल्पकार फुले-शाहू-आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात





आली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी मुद्रा मोदी से मुजरा, मोदी हटाव, देश बचाव, बेटी बचाव अशा जोरदार घोषणांनी परिसर दणाणून सोडला. यावेळी आंदोलकांनी देशात धार्मिक ध्रुवीकरण वाढत असल्याचा आरोप करत भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याची मागणी केली. तसेच निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरद्वारे मतदानाची व्यवस्था लागू करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयश आल्याची भावना व्यक्त करत नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. याचबरोबर महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्याबाबत निर्णय घ्यावा, शेतकऱ्यांच्या हिताला बाधा आणणाऱ्या परदेशी व्यापार करारांचा ◀◀ पान ३ वर

## गिनीज बुक फेम ह.भ.प.रामकृष्ण रंधवे बापूंना प्रतिष्ठेचा 'किर्तनरत्न' पुरस्कार प्रदान

आष्टी । प्रतिनिधी

पाटोदा येथील विठ्ठल संस्थानचे मठाधिपती आणि आपल्या अद्वितीय कार्याची 'गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये सुवर्ण अक्षरांनी नोंद करणारे ज्येष्ठ समाज प्रबोधनकार ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंधवे बापू यांना यावर्षीच्या मानाच्या 'कीर्तनरत्न' पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कीर्तनाच्या माध्यमातून राज्य आणि देशभरात भक्तीचा व सामाजिक जनजागृतीचा निःशुल्क प्रसार केल्याबद्दल त्यांचा हा विशेष सन्मान करण्यात आला.



श्री संत भगवानबाबा सप्ताह समिती आणि मातृभूमी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात हा भव्य सोहळा पार पडला.ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांच्या शुभहस्ते शाल, पुष्पहार आणि सन्मानपत्र देऊन रंधवे बापूंचा यथोचित सन्मान करत त्यांचे आशीर्वाद घेण्यात आले.भाविकांच्या अलोट गर्दीत रंगला सन्मान सोहळा

सुरुवातीला हा सन्मान श्री संत भगवानबाबा प्रतिष्ठान येथे आयोजित १८ व्या. राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्यातील गुणवंतांच्या सत्कार समारंभात करण्याचे नियोजित होते. मात्र दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सप्ताहात रंधवे बापूंची कीर्तन सेवा होती. यावेळी कीर्तन श्रवणासाठी उसळलेल्या हजारो भाविकांच्या अलोट गर्दीचा आणि उत्साहाचा आदर करत, त्याच दिवशी भक्तीमय वातावरणात हा सन्मान सोहळा पार पडला.राष्ट्रीय एकात्मतेचा जागर आणि मान्यवर कीर्तनकारांचा गौरव दि. २१ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'सर्वधर्म समभाव आणि राष्ट्रीय एकात्मता' या संकल्पनेवर आधारित या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.सप्ताहात दररोज महाराष्ट्रातील दिग्गज कीर्तनकारांनी आपली कीर्तन सेवा रुजू केली.मातृभूमी प्रतिष्ठान व सप्ताह समितीच्या वतीने या सर्व कीर्तनकारांचाही शाल,पुष्पहार आणि सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.सन्मानित कीर्तनकार:

ह.भ.प. सुनीताताई आंधळे, ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर,

ह.भ.प. रामगिरी महाराज शास्त्री

ह.भ.प.सविताताई महाराज केकान, ह.भ.प. हनुमान महाराज शास्त्री,

ह.भ.प.तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, ह.भ.प. भगवान महाराज राजपूत आदी

मान्यवरांची मांदियाळी

या भक्तीमय सोहळ्यासाठी ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे, ◀◀ पान ३ वर

## गजानन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे विभागीय आयुक्तांनी केले कौतुक

नवगण राजुरी । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर महसूल मंडळ नवगण राजुरी अंतर्गत तळेगाव येथे संपन्न झाले. या कार्यक्रमात गजानन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषेत लेझील पथकाच्या माध्यमातून देशभक्तीचे प्रदर्शन सादर करून सहभाग घेतल्याबद्दल विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

बीड तालुक्यातील महसूल मंडळ नवगण राजुरी अंतर्गत मौजे तळेगाव येथे छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त





जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, अप्पर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक उपविभागीय अधिकारी कविता जाधव, आदिंच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी गजानन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पारंपारीक वेशभूषेत लेझीम ◀◀ पान ३ वर

## जातीच्या भिंती तोडा, आपली माती, माणसं आणि नाती जपा

माजलगाव । प्रतिनिधी

आम्ही लहान होतो, त्यावेळी जाती धर्माच्या भिंती फार खुज्या होत्या, मागच्या काळात अनेकांनी त्यावर अनेक विटा रचून त्या माणसापेक्षाही मोठ्या केल्या आहेत. आपल्याला त्या भिंती तोडल्या पाहिजेत. जाती धर्माच्या भिंती तोडून आपली माती, माणस आणि नाती जपा असे भावनिक आवाहन अभिनेते संदीप पाठक यांनी केले.

'गुरुकृपा ' शिक्षण समूहाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. प्रा. स्नेहल पाठक, संजय मालानी, डॉ. विनोद काकडे, व्यंकटेश वैष्णव, पांडुरंग उगले, डॉ रंगनाथ गोळेकर, डॉ. भांगरे,गुरुकृपा चे डॉ यशवंत राजेभोसले यांची यावेळी उपस्थिती होती.





यावेळी संदीप पाठक यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आपल्या जुन्या आठवणी जागवल्या. कितीही मोठे झालात तरी आपल्या मातीला आणि आपल्या आईवडील, मित्रांना विसरू नका, हेच लोक आपले पाय जमिनीवर राहायला मदत करत असतात असे सांगितले. आईवडिलांना कर्जबाजारी करून लग्नावर कोट्यवधी खर्च करण्याची आजची पद्धत बदलण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले तसेच जाती धर्माच्या पलीकडे जाऊन माणूसपण जपा, हा संस्कार इथल्या मातीचा आहे, हातात दगड घेऊन कोणाचे तरी रक्त काढण्याऐवजी रक्तदान करून कोणाचा तरी जीव वाचवा. जातीवाद, धर्मवाद हा आपला मूळ स्वभाव नाही तर माणुसकी हा आपला मूळ स्वभाव आहे तो जपा असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी डॉ यशवंत राजेभोसले यांनी संदीप पाठक यांच्या जुन्या आठवणी जागवत गुरुकृपा समूहाचा प्रवास मांडला तर संजय मालानी यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या मैत्रीचा परीघ वाढवावा त्यासोबतच प्रत्येकाने कोठे थांबायचे याचे भान ठेवावे असे सांगितले. डॉ विनोद काकडे यांनी गुरुकृपा मधून परिपूर्ण माणूस म्हणून विद्यार्थी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामती विधानसभेची पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता धूसर? निवडणूक जाहीर होताच नवी अपडेट

**बारामती प्रतिनिधी**

बारामतीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मेडिकल कॉलेजच्या संलग्न रुग्णालयाला अजित पवारांचे नाव दिल्याने काही प्रमाणात धनगर समाज नाराज झाला आहे.त्यामुळे नाराज झालेल्या पैकी कुणीतरी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष निवडणूक लढणार नसला तरी बारामतीची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी आहे.



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानं रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं बारामती आणि राहुरी विधानसभा निवडणुकीसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. २३ एप्रिलला मतदान होणार असून ४ मे रोजी निकाल जाहीर केला जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार याच बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याची माहिती दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून बारामतीत विधानसभा पोटनिवडणूक न लढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुसरीकडे बारामतीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मेडिकल कॉलेजच्या संलग्न रुग्णालयाला अजित पवारांचे नाव दिल्याने काही प्रमाणात धनगर समाज नाराज झाला आहे. त्यामुळे नाराज झालेंल्या पैकी कुणीतरी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. यामुळं बारामतीची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता धूसर आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष बारामती पोटनिवडणूक लढणार नाही. पक्षांतर्गत बैठकीत निवडणूक न लढण्याचा निर्णय झाल्याची माहिती वरिष्ठ सूत्रांकडून देण्यात आली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्यात विरोधात युगेंद्र पवार यांनी बारामती विधानसभा निवडणूक लढवली होती. अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर उमेदवार न देण्याची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची भूमिका आहे. दरम्यान, राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून प्राजक्त तनपुरे हे इच्छुक आहेत. तिथं देखील निवडणूक होण्याची शक्यता आहे.

# शस्त्रक्रिया झालेल्या मुरलीधर मोहोळ यांची चंद्रकांतदादा पाटलांकडून विचारपूस

पुणे । प्रतिनिधी

पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ (र्चीश्रळवहरी चेहेश्र) यांच्यावर नुकतीच पुण्यात शस्त्रक्रिया पार पडली. या पार्श्वभूमीवर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील (उहरपवीरज्ञरपीं झरींळश्र) यांनी रुग्णालयात जाऊन मोहोळ यांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.



भेटीदरम्यान चंद्रकांतदादा पाटील यांनी मुरलीधर मोहोळ (र्चीश्रळवहरी चेहेश्र) यांना धीर देत शुभेच्छा दिल्या.आण्णा काळजी घ्या, लवकर बरे होऊन पुन्हा जोमाने कामाला लागा! अशा शब्दात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना शुभेच्छा दिल्या. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना २९ वर्षांपूर्वी कुस्ती खेळताना पायाला दुखापत झाली होती. त्यावर नुकतीच एक शस्त्रक्रिया करण्यात आली. या पार्श्वभूमीवर चंद्रकांतदादा पाटील यांनी रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली आणि त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. यावेळी त्यांनी उपस्थित डॉक्टरांशीही चर्चा करून मोहोळ यांच्या प्रकृतीबाबत माहिती जाणून घेतली. आण्णा, स्वतःच्या प्रकृतीची काळजी घ्या आणि लवकरात लवकर बरे होऊन पुन्हा त्याच उत्साहाने जनसेवेच्या कामात सक्रिय व्हा, अशी सदिच्छा पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. मुरलीधर मोहोळ यांना २९ वर्षांपूर्वी कोल्हापूरला पैलवानकी करत असताना कुस्तीच्या मैदानात गुडघ्याला गंभीर दुखापत झाली होती. इतकी वर्षे ही दुखापत त्यांनी सोसली, मात्र अलीकडे त्याचा त्रास वाढल्याने डॉक्टरांनी शस्त्रक्रियेचा सल्ला दिला होता. त्यानुसार पुण्यातील एका खासगी रुग्णालयात ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली. शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांनी मोहोळ यांना किमान एक महिना पूर्ण विश्रांती घेण्यास सांगितले आहे. सद्यस्थितीत ते सात ते आठ दिवस रुग्णालयात असतील आणि त्यानंतर घरी आराम करतील.

# महाराष्ट्रद्रोही निशिकांत दुबे काय तुमचा जावई आहे का? भीमाशंकर मंदिरातील दर्शन प्रकारावर रोहिणी खडसे संतापल्या

**पुणे । प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर मंदिरात (लहळारीहरपज्ञरी ींशाश्रिश) व्हीआयपी दर्शनावरून वाद निर्माण झाला आहे. मंदिर दुरुस्तीच्या कामामुळे सर्वसामान्य भाविकांसाठी गेल्या अडीच महिन्यांपासून मंदिर बंद ठेवण्यात आले आहे. मात्र भाजपचे खासदार डॉ. निशिकांत दुबे यांच्यासाठी मंदिर खुले करून व्हीआयपी दर्शन देण्यात आल्याचा आरोप होत आहे. डॉ. निशिकांत दुबे हे झारखंडच्या गोड्डा मतदार संघातून चार वेळा भापकडून निवडून आलेले खासदार आहे. सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकामासह भाविकांच्या सुरक्षेच्या कारणास्तव जिल्हाधिकाऱ्यांनी ९ जानेवारी २०२६ पासून तीन महिन्यांसाठी भीमाशंकर मंदिर (लहळारीहरपज्ञरी ींशाश्रिश) बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे हजारो किलोमीटर पायी व सायकल वारी करून येणाऱ्या भाविकांनाही दर्शन न घेता परत जावे लागत आहे. अशातच हेलिकॉप्टरने आलेल्या खासदार डॉ. निशिकांत दुबे यांना विशेष परवानगी देऊन मंदिरात दर्शन घडवण्यात आल्याने भाविकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. राजकीय नेत्यांसाठी मंदिर खुले आणि सर्वसामान्यांसाठी बंद का, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. महादेवाच्या मंदिरात दुजाभाव का? प्रशासनावर भाविकांचा संताप व्यक्त होत आहे, यावरती आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी संताप व्यक्त करत सवाल उपस्थित केले आहेत.



रोहिणी खडसे यांनी सोशल मिडीया एक्सवरती पोस्ट करत म्हटलंय की, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले आपल्या महाराष्ट्रातील भीमाशंकर मंदिर पुरातत्त्व विभागाच्या कामासाठी गेल्या अडीच महिन्यांपासून सर्वसामान्य भाविकांसाठी बंद आहे पण भाजपचे खासदार पळीहळज्ञरपींर्वीलशू यांच्यासाठी हे मंदिर खुले करण्यात आले. हे निशिकांत दुबे कोण आहेत माहिती आहे का ? जे नेहमी मराठी माणसाला कमी लेखतात, जे नेहमी मराठी माणसांबद्दल चुकीचे विधान करून मराठी माणसांचा स्वाभिमान दुखवतात. एकदा ते म्हणाले की मराठी लोगो को हम पटक पटक के मारेंगे. आज त्याच निशिकांत दुबे साठी महाराष्ट्रातील प्रशासन पायघड्या घालत आहे. सामान्य माणसांना वेगळा न्याय आणि महाराष्ट्रद्रोही निशिकांत दुबे यांना वेगळा न्याय का ? दुबे काय तुमचा जावई आहे का?, असं म्हणत खडसेंनी संताप व्यक्त केला आहे. मंदिर दुरुस्तीच्या कामामुळे सर्वसामान्य भाविकांसाठी गेल्या अडीच महिन्यांपासून मंदिर बंद ठेवण्यात आले आहे. परिणामी नियमाप्रमाणे कुठल्याही भाविकाला मंदिरात प्रवेश आणि दर्शन घेता येत नाहीये. असेअसताना मात्र भाजपचे खासदार डॉ. निशिकांत दुबे (इगझ चझ छळीहळज्ञरपीं ऊीलशू) यांच्यासाठी हे मंदिर खुले करून थेट व्हीआयपी दर्शन देण्यात आल्याचा आरोप होत आहे. डॉ. निशिकांत दुबे हे झारखंड च्या गोड्डा मतदार संघातून चार वेळा भापकडून निवडून आलेले खासदार आहेत. या व्हीआयपी दर्शनावरून (तखझ ऊरींहरप) भीमाशंकर मंदिर प्रशासन वादाच्या भोवऱ्यात सापडलंआहे.

# पुण्यात पुन्हा 'वैष्णवी'ने संपवलं जीवन; सासरच्या जाचाला कटाळून ८ महिन्यांतच विवाहितेचं टोकाचं पाऊल

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यात पुन्हा एकदा विवाहित महिलेने (थोशप) सासरच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. लग्नानंतर अवघ्या आठ महिन्यात तरुणीने आपलं जीवन संपवलं. त्यामुळे, सासरच्या जाचाला कंटाळून पुण्यात आणखी एका वैष्णवीने स्वत:ला संपवल्याची भावना परिसरात निर्माण झाली आहे. पुण्यातील (ीिंपश) लोणीकंद परिसरातील ही घटना असून वैष्णवी जामकर असं आत्महत्या केलेल्या विवाहीत तरुणीचे नाव आहे.

सासरच्या लोकांकडून, छळ करत पैशाची मागणी करण्यात येत असल्यानेच तरुणीने राहत्या घरातच जीवन संपवलं, घरातच ओढणीने गळफास घेत केली आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती आहे. याप्रकरणी, मुलीच्या कुटुंबीयांकडून दिलेल्या फिर्यादीनुसार पुण्यातील लोणीकंद पोलीस स्टेशनमध्ये सासू-सासरा आणि नवऱ्याच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. मात्र, या आत्महत्याप्रकरणामुळे पुन्हा एकदा पिंपरीतील वैष्णवी हगवणे प्रकरणाच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत. पुण्यातील मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणे यांचं मृत्यूप्रकरण राज्यभरात चर्चेत आलं होतं. वैष्णवीने आत्महत्या केल्याचं सुरुवातीला समोर आलं होतं. पण, त्यांच्या शवविच्छेदन अहवालात शरीरावर मारहाणीच्या खुणा सापडल्या आहेत.




त्यांच्या आई-वडिलांनी वैष्णवी यांचा हुंड्यासाठी छळ होत असून तिची हत्या केल्याचा आरोप केला होता. याप्रकरणी पोलिसांनी फरार सासरे राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणेंसह हगवणे कुटुंबातील संबंधितांना अटक केली होती. या घटनेनं, पुन्हा एकदा हुंडाबळीचा विषय राज्यभर चर्चेत आला होता. मात्र, २०२६ मध्येही हुंड्यासाठी विवाहितेचा छळ केल्याच्या घटना समोर घडत असल्याने पुरोगामी महाराष्ट्रात राज्य सरकार आणि पोलिसांपुढे हे मोठं आव्हान आहे. भारतात १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला. या कायद्यानुसार लग्नात एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाला थेट किंवा अप्रत्यक्ष कुठल्याही स्वरुपातील देवाण घेवाण करणं गुन्हा आहे. पण, अजूनही समाजात हुंडा घेणं, त्यासाठी होणारा छळ, प्रसंगी महिलांचे जाणारे बळी या गोष्टी अजूनही का थांबले नाहीत? असा प्रश्न उपस्थित होतो.

# गॅसटंचाईचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील खानावळींवर परिणाम

**पुणे । प्रतिनिधी**

विद्यापीठात गॅसटंचाईमुळे फूडमॉल तसेच अनेक खानावळी बंद होण्याच्या मार्गावर आहेत. तर, विद्यापीठाच्या कुलसचिवांनी पत्र काढत गॅसपुरवठ्याबाबत निश्चिंत राहण्याचे आवाहन केले आहे. दुसरीकडे, विद्यार्थी संघटनांनी मात्र विद्यापीठाने काय उपाययोजना केल्या? असा प्रश्न उपस्थित केला आहे.



आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतात सीएनजी आणि एलपीजीचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. घरगुती वापरासाठी पीएनजी पुरवठा टिकवून ठेवण्याची काळजी म्हणून सरकारने औद्योगिक क्षेत्राला गॅसपुरवठा कमी केला आहे. संबंधित सर्व परिस्थितीचा विपरीत परिणाम जवळपास ५ हजार रहिवासी विद्यार्थी असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिसरातील खानावळी व उपाहारगृहांवर झाला आहे. विद्यापीठातील खानावळींमध्ये भोजन घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांनी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना केंद्र शासनाच्या आदेशानुसार, जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना १०० टक्के गॅस सिलिंडरचे वाटप करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच, या अनुषंगाने विद्यापीठाकडूनही जिल्हाधिकारी पुणे जिल्हा यांना देखील पत्राद्वारे विनंती करण्यात आलेली आहे. याबरोबरच विद्यापीठातील भोजनगृहांमध्ये अन्नपुरवठा करण्यासाठी विद्यापीठस्तरावर पूर्णक्षमतेने प्रयत्न करण्यात येत असून, भोजनगृहांमध्ये भोजन घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी याबाबत निश्चिंत राहावे, असे आवाहन विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिवांनी केले आहे.

# दिवाळी फराळ उशिरा पोहोचला; कुरिअर कंपनीला भरपाईचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

दिवाळीचा आनंद परदेशात असलेल्या मुलापर्यंत पोहोचावा, या भावनेतून पुण्यातील एका वडिलांनी फराळ कुरिअर कंपनीमार्फत अमेरिकेत पाठविले. '२९ ऑक्टोबरपर्यंत फराळ मुलापर्यंत पोहोचेल' असे आश्वासनही देण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात पार्सल अनेक दिवस मुंबईतच अडकून राहिले आणि पाच दिवस उशिराने अमेरिकेत पोहोचले.

तोपर्यंत फराळातील सर्व पदार्थ खराब झाले होते. मुलासाठी प्रेमाने पाठविलेला फराळ वाया गेल्याने संतप्त झालेल्या वडिलांनी ग्राहक आयोगात धाव घेतली. अन आयोगानेही वडिलांच्या बाजूने निकाल देत कुरिअर कंपनीने तक्रारदारास १३४३४ रुपये व्याजासह तसेच ७ हजार रुपये नुकसान भरपाई आणि ५०० रुपये तक्रार खर्च म्हणून देण्याचे आदेश दिले. या प्रकरणात, बाणेर येथील शरद मानकर यांनी नारायण पेठ येथील यु. डी. एक्स. वर्ल्डवाईड या कुरिअर कंपनीविरुद्ध तक्रार दिली होती. त्यांनी २२ ऑक्टोबर २०२४ रोजी अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे राहणारा मुलगा अमेयला दिवाळीचा फराळ व मिठाई पाठविली होती. फराळासाठी २५६४ रुपये आणि कुरिअरसाठी १०८७० रुपये भरले होते. कंपनीकडून हे पार्सल २८ किंवा २९ ऑक्टोबरपर्यंत पोहोचेल, असे सांगण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात हे पार्सल २ नोव्हेंबरला अमेरिकेत पोहोचले. यादरम्यान पार्सलला ट्रॅक केले असता, ते तपासात कोठेही मिळाले नाही. तसेच, पार्सल मिळाल्यानंतर सर्व खाद्यपदार्थ खराब झाले होते. याबाबत मानकर यांनी कुरिअर कंपनीकडे नुकसान भरपाईची मागणी केली. परंतु, कंपनीने ५ हजार देण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे मानकर यांनी ग्राहक आयोगात धाव घेतली. एखादी व्यक्ती परदेशी असणाऱ्या आपल्या नातेवाइकास कुरिअरद्वारे काही वस्तू पाठवते. तेव्हा त्या व्यक्तीची एवढीच साधारण अपेक्षा असते की, सदर वस्तू अथवा पदार्थ संबंधित व्यक्तीला ठराविक कालावधीत मिळावेत. त्यानुसार, कुरिअर कंपनीने कुरिअर करण्यासाठी आकारलेली प्रचंड मोठी रक्कम देण्यास देखील ते तयार असतात. याप्रकरणात, थोडी नव्हे, तर १० हजार ८७० रुपये मोजण्यात आले. जेव्हा एखादी सेवा रक्कम घेऊन पुरविण्याचे आश्वासन दिले जाते. तेव्हा त्या सेवेमध्ये कोणताही दोष अथवा कोणतीही त्रुटी ठेवणे उचित ठरत नाही, असे ग्राहक आयोगाचे अध्यक्ष अनिल जवळेकर आणि सदस्या शुभांगी दुनाखे यांनी स्पष्ट केले. ग्राहकाने ठराविक वेळेत सेवा मिळेल या विश्वासावर मोठी रक्कम मोजलेली असते. पार्सल वेळेत पोहोचले नाही आणि त्यातील पदार्थ खराब झाले, तर ती सेवेमधील त्रुटी ठरते. ग्राहक आयोगाचा हा निर्णय ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणारा असून, सेवा देणाऱ्या कंपन्यांनी अधिक जबाबदारीने काम करण्याचा स्पष्ट संदेश देणारा आहे. यास्वरूपाच्या अडचणी टाळण्यासाठी ग्राहकांनी विश्वासार्ह सेवेचा अवलंब करण्यास प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे.

# विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळायला हवे - डॉ. पंडित विद्यासागर

पुणे । प्रतिनिधी

आता दिवसेंदिवस शिक्षण खुप महाग होत चालले असून शिक्षणातही खासगीकरणही वाढले आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापुर्ण शिक्षण (झींपश छशुी) मिळायला पाहिजे. याकडे सर्वांनीच लक्ष द्यायला पाहिजे, असे मत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी व्यक्त केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या (झींपश छशुी) गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या येरवडा येथील डॉ.आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास यावर एक दिवसीय राज्यस्तरीय परिसंवाद घेण्यात आला. यावेळी बीजभाषक म्हणून डॉ. पंडित विद्यासागर बोलत होते. पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, उपाध्यक्ष डॉ. डी. जी. देशकर, सचिव संजीव बोधनकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गौतम बनसोडे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. रुपेश थोपटे, राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. प्रमोद हिरोडे, परिसंवादाचे समन्वयक प्रा. शिवाजी मोटेगावकर, प्रा. कैलास शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी परिसंवांदात डॉ.माहेश्वरी गावित, डॉ. नवनाथ तुपे, डॉ.विकास माने, प्रा. डॉ. ललित भवरे या मान्यवरांचे विविध विषयावर व्याख्यान झाले. प्राध्यापकांच्या संशोधन पेपरच्या जर्नलचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# पुणे महापालिकेचे 'मिशन अन्नदा'! आता भटक्या श्वानांना मिळणार जेवण; १ कोटींची मोठी तरतूद

पुणे । प्रतिनिधी

शहरातील भटक्या व मोकाट श्वानांना आता महापालिकेकडून खाद्य पुरवठा केला जाणार आहे. त्यासाठी महापलिकेकडून बंगळुरूच्या धर्तीवर पुण्यात 'मिशन अन्नदा' हा उपक्रम राबविण्यात येणार असून, या उपक्रमासाठी महापालिका आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात १ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. अशा प्रकारचा उपक्रम राबविणारी पुणे ही पहिली महापालिका ठरणार आहे.



शहरातील मोकाट श्वानांची जबाबदारी महापालिकेकडे आहे. त्या अंतर्गत महापालिकेने शहरात केलेल्या श्वान गणनेत सुमारे अडीच लाखांपेक्षा अधिक भटके श्वान आढळून आले होते. या श्वानांनी चावा घेतल्यास त्यामुळे रेबीजसारखा जीवघेणा आजार होत असल्याने महापालिकेकडून त्यांना पकडून त्यांचे लसीकरण तसेच संख्या नियंत्रणात राहण्यासाठी निर्बिजीकरण केले जाते. शहरात असलेल्या या मोकाट तसेच भटक्या श्वानांना खाण्यासाठी शहरातील प्राणिप्रेमींकडून खाद्य दिले जाते.

तर, बहुतांश श्वान नागरिकांनी कचरा पेटीत टाकलेला कचरा, खाद्यपदार्थांच्या हातगाड्यांच्या परिसरात खाण्यासाठी भटकत असतात. या श्वानांच्या निर्बीजीकरण करण्याची जबाबदारी महापालिकेवर असल्याने अनेकदा या भटक्या श्वानांचे वजन १० किलोपेक्षा कमी असल्यास त्यांना भूल देता येत नाही. त्यामुळे, महापालिकेस त्यांचे वजन वाढविण्यासाठी त्यांना खाद्य द्यावे लागते. तसेच सांभाळावे लागते. तसेच, अनेकदा श्वानांना खायला न मिळाल्यास तसेच ते उपाशी राहिल्यास त्यांचे चावण्याचे प्रमाणही वाढते. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने आता या श्वानांना महापालिकेकडून खाद्य पुरविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी, ही स्वतंत्र करण्यात आली आहे. महापालिकेकडून या उपक्रमांतर्गत श्वानांना खाद्य पुरविण्यासाठी स्वयंसेवक, स्वयंसेवी संस्थाची मदत घेतली जाणार आहे. त्यासाठी महापालिकेकडून शहरातील पाच परिमंडळांतर्गत भटक्या श्वानांसाठी फिडींग पॉईंट निश्चित केले जाणार आहेत. महापालिकेकडून शहरात सध्या स्वयंसेवी संस्था तसेच महापालिकेकडे श्वानांना खाद्यपदार्थ देत असलेल्या प्राणिप्रेमींकडून आलेल्या मागणीनुसार महापालिकेच्या आरोग्य विभागाने ९० ठिकाणी फिडींगसाठी मान्यता दिली आहे. मात्र, त्याच वेळी संबंधित ठिकाणाची स्वच्छता, त्यासाठीच्या वेळा ठरवून दिलेल्या असून अशा ठिकाणी माहिती फलकही लावण्याच्या सूचना केल्या आहेत. त्याच, धर्तीवर आणखी फिडींग पॉईट तयार केले जाणार असल्याचे महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. सारि, असका फुंडे- भोसले यांनी सांगितले.

# युद्धाचा अजब परिणाम! युद्धामुळे 'हा' दुर्मिळ मासा प्रथमच पुण्याच्या बाजारात

**पुणे । प्रतिनिधी**

**अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे आखाती देशांमधील युध्दपरिस्थिती चिघळल्याने देशातून होणारी मासळीची निर्यात पूर्ण ठप्प झाली आहे. परिणामी, देशाच्या पश्चिम किनारपट्टीहून कुवेतमध्ये जाणाऱ्या डिलक्स पापलेटलाही त्याचा फटका बसला आहे. निर्यात बंद झाल्याने एरवी पुण्याच्या बाजारात कधीही न दिसणारा डिलक्स पापलेट मासा युध्दामुळे पुणेकरांच्या ताटात दिसू लागले आहे.**



गणेश पेठ येथील मासळी बाजारात दररोज ७० ते ८० किलो डिलक्स पापलेट दाखल होत असून त्याला किलोला १ हजार ९०० रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. देशाच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीहून ताजा तसेच शीतगृहातील पापलेटची निर्यात करण्यात येते. यामध्ये, कुवेतमध्ये डिलक्स पापलेटची मोठ्या प्रमाणात निर्यात होते. ७०० ग्रॅमपासून ते एक किलोपर्यंत असणारा हा मासा कमी प्रमाणात मिळत असल्याने त्याला दरही चांगला मिळतो.

त्यामुळे, या पापलेटची निर्यात करण्याकडे व्यापारी वर्गाचा कल जास्त असतो. युध्दामुळे निर्यात बंद झाल्याने ताजा डिलक्स पापलेट येथील बाजारात दाखल होत आहे. डिलक्स खेरीज एरवी दररोज बाजारात येणारे सुपर, कापरी आदी पापलेट बाजारात दाखल होत आहे. जास्तीत जास्त ५०० ते ६०० ग्रॅमपर्यंत बाजारात येत असलेल्या या पापलेटच्या किलोला १ हजार ५०० ते १ हजार ७०० रुपयांचा दर मिळत आहे.